अहवाल क्रमांक १०१

पंचायती राज समिती

२००२-२००३

(दहावी महाराष्ट्र विधानसभा)

दुसरा अनुपालन अहवाल

(पंचायती राज समितीच्या सन १९९५-९६ च्या दुसऱ्या अहवालातील कोल्हापूर व नागपूर जिल्हा परिषदेच्या प्रशासन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईवरील समितीचा अनुपालन अहवाल)

(सदर अहवाल दिनांक ११ डिसेंबर, २००३ रोजी विधानसभेच्या / विधानपरिषदेच्या पटलावर ठेवण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
२००३

पंचायती राज समिती

२००२-२००३

(दहावी महाराष्ट्र विधानसभा)

दुसरा अनुपालन अहवाल

(पंचायती राज समितीच्या सन १९९५-९६ च्या दुसऱ्या अहवालातील कोल्हापूर व नागपूर जिल्हा परिषदेच्या प्रशासन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईवरील समितीचा अनुपालन अहवाल)

पंचायती राज समिती (२००३ - २००४)

(दिनांक २९ ऑक्टोबर २००३ पासून)

समिती प्रमुख

(१) श्री.राजन पाटील, वि.स.स.

(सदस्य)

(२) श्री.अब्दुल रशीद ताहीर-मोमीन, वि.स.स.
(३) श्री.नरेशचंद्र ठाकरे, वि.स.स.
(४) श्री.दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
(५) श्री.अनंतराव देवसरकर, वि.स.स.
(६) श्री.भाऊराव पाटील, वि.स.स.
(७) श्री.सुरेश लाड, वि.स.स.
(८) श्री.रमेशचंद्र बंग, वि.स.स.
(९) श्री.तुकाराम तुपे, वि.स.स.
(१०) श्री.संपतराव पवार-पाटील, वि.स.स.
(११) श्री.जे.पी.गावीत, वि.स.स.
(१२) श्री.गणपतराव कदम, वि.स.स.
(१३) श्री.गुलाबराव पाटील, वि.स.स.
(१४) श्री.ज्ञानेश्वर धाने-पाटील, वि.स.स.
(१५) श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.
(१६) श्री.रामकृष्ण दोधा पाटील, वि.स.स.
(१७) श्री.खोमेश्वर रहांगडाळे, वि.स.स.
(१८) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.स.स.
(१९) श्री.रामचंद्र नावंदिकर, वि.स.स.
(२०) श्री.मधुकर कुकडे, वि.स.स.
(२१) श्री.चंद्रकांत बटेसिंह रघुवंशी, वि.प.स.

(२२) श्री.मदन पाटील, वि.प.स.
(२३) श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.
(२४) श्री.बळवंतराव ढोबळे, वि.प.स.
(२५) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.विलास पाटील, प्रधान सचिव
(२) श्री.अ.ना.कळसे, सचिव
(३) श्री.यू.के.चव्हाण, उप सचिव
(४) श्री.शं.तु.गावडे, अवर सचिव

टीप : श्री.व्ही.यु.डायगव्हाणे, वि.प.स. यांनी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त जागेवर श्री.मदन पाटील, वि.प.स. यांची दिनांक २१ नोव्हेंबर २००३ रोजी समिती सदस्य म्हणून मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी नामनियुक्ती केली आहे.

प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा प्रमुख, समितीने आपल्या वतीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन समितीच्या सन १९९५-१९९६ च्या दुसऱ्या अहवालातील कोल्हापूर व नागपूर जिल्हा परिषदेच्या वार्षिक प्रशासन अहवालासंबंधी शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईसंबंधी दुसरा अनुपालन अहवाल सादर करीत आहे.

समितीचा दुसरा अहवाल महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहांना दिनांक १० एप्रिल २००० रोजी सादर करण्यात आला.

शासनाने समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईच्या संबंधात जारी केलेले आदेश, परिपत्रके इत्यादी परिशिष्ट "अ" मध्ये समाविष्ट केले आहेत. शासनाकडून आलेल्या माहितीच्या संदर्भात समितीने दिनांक १२, १८ जून २००३ व २ जुलै २००३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये दिले आहे.

तथापि, त्या अहवालातील समितीच्या शिफारशींवर शासनाने केलेली कारवाई विचारात घेतल्यानंतर समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात समाविष्ट केले आहेत.

श्री.एस.एस.हुसैन, सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.ना.बा.पाटील, सचिव, जलसंधारण विभाग, श्री.एस.एस.मोमिन, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती), श्री.एन.डी.वडनेरे, सचिव, पाटबंधारे विभाग, श्री.बी.सी.खटूआ, पाणीपूरवठा व स्वच्छता विभाग, श्री.जे.एम.फाटक, सचिव, शालेय शिक्षण विभाग,श्री.नविन कुमार, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि श्री.प्रभाकर देशमुख मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर, श्री.कुणाल कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर यांनी समितीच्या कामकाजात दिलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभारी आहे. तसेच श्री.सी.जी.पवार, मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा हे समितीच्या कामकाजात सहाय्य करण्यासाठी समितीच्या बैठकींना उपस्थित होते. समितीच्या कामकाजात सहाय्य केल्याबद्दल समिती त्यांचीदेखील आभारी आहे.

समितीने हा अहवाल दिनांक २९ नोव्हेंबर २००३ रोजी विचारात घेतला व संमत केला.

विधान भवन
नागपूर/मुंबई
दिनांक २९ नोव्हेंबर २००३

श्री.राजन पाटील,
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	विषय (२)		पृष्ठ क्रमांक (३)
१	मौजे शिरोली (ता.हातकणंगले) येथील कुमार विद्यामंदिर प्राथमिक शाळेबाबत, जि.प. कोल्हापूर	..	१
२	प्राथमिक आरोग्य केंद्र भुयेला, जि.प., कोल्हापूर	..	५
३	गडहिंग्लज तालुक्यातील ६ पाझर तलावांची अपूर्ण असलेली कामे, जि.प., कोल्हापूर.	..	१०
४	अंजनगांव, ता.हिंगणा पाणीपुरवठा योजना, जिल्हा परिषद, नागपूर	..	२१
५	सुकळी कलार, ता.हिंगणा विहीर पाणीपुरवठा योजना, जिल्हा परिषद, नागपूर.	..	२५
	परिशिष्ट अ शासन निर्णय व परिपत्रके	..	२९
	परिशिष्ट ब समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त.	..	३५

अहवाल

एक : जिल्हा परिषद कोल्हापूर मौजे शिरोली (ता.हातकणंगले) येथील कुमार विद्यामंदिर प्राथमिक शाळेबाबत.

कुमार विद्यामंदिर शिरोली, या प्राथमिक शाळेला सध्या असलेल्या खोल्या कमी पडत असून अधिक खोल्यांची गरज आहे. येथील अंगणवाडीचा वर्ग देखील शाळेच्या व्हरांड्यात भरविण्यात येतो, कारण अंगणवाडीसाठी स्वतंत्र जागा नाही. तसेच सदर शाळेच्या आवारात आठवडे बाजार भरतो. हा बाजार दुसरीकडे भरविण्यात यावा अशी गावकऱ्यांनी मागणी करुनही तेथील प्रशासनाने या मागणीकडे अद्याप लक्ष दिलेले नाही. अशा मागण्या असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. समितीच्या मते ही बाब गंभीर असल्याने शाळेतील आवश्यक त्या खोल्या, अंगणवाडीसाठी स्वतंत्र जागा देण्यात यावी अशी समितीची शिफारस शिफारस आहे. मुळातच शाळेच्या आवारात आठवडे बाजार भरविण्यास परवानगी देणे हे अयोग्य आहे. त्यातच तो तेथून हलविण्याबाबत मागणी करुनही त्याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. यासंदर्भात समितीला जी लेखी माहिती प्राप्त झाली आहे त्यात आठवडे बाजाराची जागा स्वतंत्र असून ती शाळेशेजारी आहे. हा बाजार फक्त शनिवारी दुपारी ४ नंतर भरविण्यात येतो असे समर्थन मान्य नाही कारण ते न पटणारे आहे. तेथील विद्यार्थ्यांना शांतपणे विद्यार्जन करता येईल, असे वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने आठवडे बाजार शाळेपासून लांब दुसरीकडे हलविण्यात यावा. या संदर्भात केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला विनाविलंब पाठविण्यात यावा अशी समितीने दुसऱ्या अहवालात शिफारस केली होती.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या दृष्टीने ज्या शिक्षणाच्या उदात्त ध्येयापोटी शासन अमाप निधी खर्च करीत आहे. त्यातील मुख्य घटक असलेल्या शिक्षकांची बेपर्वाई ही बाब गंभीर आहे. शिक्षक व विद्यार्थी सुसंवाद असणे ही अपरिहार्य बाब आहे. तथापि, वेगवेगळ्या जिल्हा परिषदांना समितीने भेटी दिल्या असता बहुतेक ठिकाणी शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत असे समितीच्या निदर्शनास आले आहे. सबब शासनाने ठाम आदेश काढून शिक्षकांनी मुख्यालयीच रहाणे अनिवार्य करण्यात यावे व जे शिक्षक या आदेशांचे पालन करणार नाहीत त्यांच्यावर ठोस कारवाई करण्यात यावी. या आदेशाची प्रत समितीला पाठविण्यात यावी अशी समितीने आग्रहाची शिफारस केली होती.

या शिफारशी संबंधात जिल्हा परिषदेने केलेल्या कारवाईबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत असे नमूद केले की, पंचायत राज समितीस कुमार विद्यामंदिर शिरोली येथील एका वर्ग खोलीतील खिडकी जवळील दगड निघालेले दिसून आले होते. सदरचे दगड पुन्हा बसवून वर्ग खोली दुरुस्त करुन घेण्यात आलेली आहे. तसेच शाळेसाठी कमी पडणाऱ्या वर्ग खोल्या

बांधकामासाठी अनुदान प्राप्त होताच वाढीव खोल्यांची पूर्तता करणेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर शाळेतील विद्यार्थ्यांना दिनांक ३ मे,१९९७ रोजी एकूण ४२ गणवेशांचे संच मिळाले, ते शाळेतील अनु.जातीच्या विद्यार्थ्यांना वाटले आहेत. तसेच लेखन साहित्याचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात आले :-

(१) पाटी-२१, (२) पेन्सील पुडे-२१, (३) पुस्तक संच मराठी-०९, (४) पुस्तक संच गणित - ०९, (५) फुटपट्टया-२१, (६) रंगित खडू -२१, (७) शिसपेन्सील-२१, (८) चित्रकला वही-२१ वरील लेखन साहित्य दिनांक ७ जुलै,१९९७ रोजी विद्यार्थ्यांना वाटप केलेले आहे.

एकूण विद्यार्थ्यांच्या २५ टक्के प्रमाणे पुस्तक खरेदी करणेबाबत शासनाच्या सूचना आहेत. त्याप्रमाणे एकूण विद्यार्थी संख्येच्या २५ टक्के प्रमाणे पात्र विद्यार्थ्यांना पुस्तके देण्यात आलेली आहेत. जे शिक्षक मुख्यालयी रहात नाहीत, त्या शिक्षकांची एक वेतनवाढ रोखण्याचे आदेश दिनांक १५ फेब्रुवारी,१९९९ ला निर्गमित केले आहेत. तशी नोंद सेवा पुस्तकामध्ये घेण्यात आलेली आहे.

शालेय पोषण आहार अंतर्गत शिरोली नं ४ मधील १ ली ते ५ वी साठी जुलै, ऑगस्ट १९९७ तांदळाचा कोटा दिनांक २५ सप्टेंबर १९९७ रोजी प्राप्त झाला. त्यावेळी अनुक्रमे ३१० व ३०५ तांदूळ पिशव्या मिळाल्या होत्या. दि.२६ व २७ सप्टेंबर,१९९७ रोजी त्याचे वाटप केले होते. दिनांक १३ ऑगस्ट, १९९८ रोजी समितीने रजिस्टर पाहिले असता नोंदी व्यवस्थित नव्हत्या. त्या नोंदी दुरूस्त करून अद्यावत ठेवल्या आहेत. परंतु शिरोली नं.१ या शाळेतील १ पिशवी खराब आढळून आली ती तांदळाची पिशवी तहसीलदार कार्यालय, हातकणंगले यांचेकडून बदलून आणून दिनांक २७ फेब्रुवारी,१९९९ रोजी विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलली आहे.

श्री.देशपांडे यांना विभागीय चौकशीसाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियम,१९८१ च्या ६(२) अन्वये आरोपपत्र ठेवून नोटीस दिली होती. त्यांनी आरोप मान्य केल्याने विभागीय चौकशी प्रस्तावित न करता मूळ वेतनावर आणण्याची शिक्षा देण्यात आली. या कार्यालयाच्या दिनांक ११ मे,१९९९ च्या आदेशान्वये त्यांना मूळ वेतनावर आणले. त्यानंतर त्यांनी दिनांक ३० जून,१९९९ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतली. स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर श्री.देशपांडे यांनी दिनांक १ जुलै,१९९९ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या शिक्षेबाबत मा.विभागीय आयुक्त पुणे यांचेकडे अपील केले असून अपिलाचा निर्णय अद्याप व्हावयाचा आहे.

जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता बहुतेक ठिकाणी शिक्षक मुख्यालयी रहात नाहीत, असे समितीच्या निदर्शनास आले आहे. सबब शासनाने ठाम आदेश काढून शिक्षकांनी मुख्यालयीच रहाणे

अनिवार्य करण्यात यावे व जे शिक्षक या आदेशांचे पालन करणार नाहीत त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. या आदेशाची प्रत समितीला पाठविण्यात यावी अशी समितीने शिफारस केली होती.

याबाबत समितीच्या शिफारशीनुसार ग्रामविकास व जलसंधारण विभागाने १४ नोव्हेंबर,२००२ रोजी शासन परिपत्रक क्र.अराप १०००-प्र.क्र.३१३२-१५ अन्वये आवश्यक आदेश निर्गमित केले आहेत, "जिल्हा परिषदेमधील शिक्षकांना मुख्यालयी राहणे अनिवार्य आहे. जे शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत असे आढळून आल्यास त्यांच्याविरुध्द तातडीने कठोर कारवाई करावी. अन्यथा संबंधित शिक्षकांविरुध्द कारवाई न करण्यात जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्याविरुध्द तातडीने कारवाई करण्यात यावी."

या शिफारशी संदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे:-

(अ) शाळेच्या वऱ्हांड्यात भरविण्यात येत असलेली अंगणवाडी नवीन बांधकाम करण्यात आलेल्या शाळेच्या इमारतीत त्यांना जागा देण्यात आल्या आहेत. समितीच्या शिफारशींप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

(ब) ग्राम पंचायत शिरोली पुलाची, ता.हातकणंगले येथील गट क्र.१, क्षेत्र क्रमांक ४० आर मध्ये प्राथमिक शाळा इमारत आहे. ग्रामपंचायत गट क्र.१ मधील क्षेत्र ४.०२ मध्ये आठवडा बाजार भरविण्याचा निर्णय ग्राम पंचायतीने दिनांक ३० नोव्हेंबर १९९८ च्या ठरावाने घेतलेला आहे. आठवढा बाजार भरविण्याचे ठिकाण व प्राथमिक शाळा इमारत ५०० फूट अंतरावर आहे. आठवडे बाजार शनिवारी दुपारी ५.०० वा. च्या नंतर भरतो. शनिवारी शाळा भरण्याची वेळ सकाळी १०.३० वा. पर्यंत आहे. त्यामुळे दूर अंतरावर भरणाऱ्या बाजाराचा त्रास विद्यार्थ्यांना होत नाही, असे पंचायतीचे म्हणणे आहे. कारण शाळेत ज्यावेळी विद्यार्थी असतात त्यावेळी बाजार भरलेला नसतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना शांतपणे विद्यार्जनामध्ये कोणताही अडथळा होत नाही. आठवडा बाजार झाल्यानंतर ग्राम पंचायतीकडून सदर बाजार जागेची साफसफाई करण्यात येते, असे अभिप्राय सरपंच, शिरोली व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांनी अनुक्रमे दिनांक ११ एप्रिल,२००१ व १६ एप्रिल,२००१ च्या पत्रान्वये कळविले होते. पंचायत राज समितीच्या सन २०००-२००१ च्या दुसऱ्या अहवालातील परिच्छेद क्रमांक १ मध्ये सुचित केल्याप्रमाणे आठवडा बाजार शाळेपासून अन्यत्र हलविण्याबाबत जिल्हा परिषद कार्यालयाकडून ग्राम पंचायतीला वेळोवेळी लेखी सूचना दिल्या आहेत. तसेच ग्राम पंचायतीच्या सरपंच व ग्रामसेवक यांना बोलावून समितीच्या

शिफारशीप्रमाणे कार्यवाही करण्यास सांगितले आहे. तरी देखील बाजार अद्यापि हलविलेला नाही, तसेच बाजार त्या ठिकाणी का सुरु ठेवावा, याबाबत पंचायतीने केलेल्या निवेदनावर पुन्हा दिनांक २१ एप्रिल,२००१ अन्वये ग्राम पंचायतीला कळविले आहे.

अभिप्राय व शिफारस :

कुमार विद्यामंदिर, शिरोली, जि.कोल्हापूर प्राथमिक शाळेच्या वऱ्हांड्यात भरविण्यात येत असलेल्या अंगणवाडीसाठी नवीन बांधकाम करण्यात आलेल्या शाळेच्या इमारतीत दिलेल्या जागेमध्ये नियमित अंगणवाडी सुरु राहील अशी दक्षता घेण्यात यावी असे समितीचे मत आहे. समितीने केलेल्या शिफारशींवर कार्यवाही केल्याबाबत समितीने समाधान व्यक्त केले आहे.

कोल्हापूर जिल्हा परिषदेअंतर्गत विविध शाळांना समितीने भेटी दिल्या असता बहुतेक ठिकाणी शिक्षक मुख्यालयी राहत नाही असे समितीच्या निदर्शनास आले होते, त्यामुळे जिल्हा परिषदेमधील जे शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत, त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करावी अशी शिफारस पंचायत राज समितीने केली होती त्या शिफारशीला अनुसरुन दिनांक १४ नोव्हेंबर,२००० रोजी काढण्यात आलेल्या आदेशानुसार जे शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत असे आढळून आल्यास त्यांच्याविरुध्द तातडीने कठोर कारवाई करावी अन्यथा संबंधित शिक्षकांविरुध्द कारवाई न करण्यास जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्याविरुध्द तातडीने कारवाई करण्याबाबत काढलेल्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. अशी समितीची शिफारस आहे याबाबत काय कारवाई करण्यात आली आहे याचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करावा.

शाळेच्या आवारात आठवडा बाजार भरतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता भंग होते तसेच गैरसोईचे सुध्दा होते, म्हणून आठवडा बाजार शाळेपासून दूर भरविण्यात यावा. या शिफारशीबाबतही शासनाने कोणतीही उपाययोजना अथवा कार्यवाही केलेली नाही. समितीने केलेल्या शिफारशींची दखलच घेतली नसल्यामुळे समितीने या प्रकरणी खेद व्यक्त करुन आठवडा बाजार शाळेपासून दूर अंतरावर भरविण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. या शिफारशींबाबत आग्रही मत प्रतिपादन केले असून या सबंधी शासनाची भूमिका काय आहे त्याचा अहवाल समितीकडे पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

दोन : प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयेला, जि.प. कोल्हापूर

भुयेला (ता.पन्हाळा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीत होणाऱ्या गळतीसंबंधी व इतर दुरुस्तीसंबंधात कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असून पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच मुख्य इमारतीवर सिमेंट पत्र्याचे छप्पर टाकण्याचे काम सुरु झाले असून ते जून महिन्यापर्यंत पूर्ण होईल असे विभागाकडून समितीला साक्षीच्या वेळी सांगण्यात आले. सबब या इमारतीची संपूर्ण दुरुस्ती झाल्यानंतर तद्संबंधिचा अहवाल समितीला विनाविलंब पाठविण्यात यावा अशी समितीने शिफारस केली होती.

समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, ग्रामीण भागातील जवळपास ८० टक्के आरोग्य केंद्रांच्या इमारती निकृष्ठ दर्जाच्या असतात. बऱ्याच ठिकाणी इमारतीच्या छपरातून पाण्याची गळती होते. तथापि, संबंधित अधिकारी त्याकडे म्हणावे तसे लक्ष देत नाहीत. आरोग्य केंद्रातील गळतीमुळे लोकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता असते. ग्रामीण जनतेच्या आरोग्याशी निगडीत असा हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असल्यामुळे शासनाने याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे असे समितीचे मत आहे. म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद आणि आरोग्य विभाग यांनी एकत्र येऊन या प्रकरणी योग्य मार्ग काढण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व आरोग्य केंद्राच्या इमारतींची तपासणी करण्यात यावी व आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने मार्ग व उपाय सुचवून सत्वर कार्यवाही करुन त्या कार्यवाहीचा अहवाल समितीला विनाविलंब पाठविण्यात यावा अशी समितीने दुसऱ्या अहवालात आग्रहाची शिफारस केली होती.

या शिफारशीसंदर्भात जिल्हा परिषदेने केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे :-

प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयेला, ता.करवीर येथील वैद्यकीय अधिकारी/एएमएम/एनएम/एसआय/कंपाऊंडर यांचे निवासस्थानाच्या इमारतीची दिनांक २२ मार्च,१९९९ रोजी सर्व दुरुस्तीची कामे रुपये १.५७ लक्ष इतका खर्च करुन पूर्ण केली आहेत. या कामांमध्ये फेर विद्युतीकरण कामांचा समावेश आहे. सध्या तरी निवासस्थानांच्या दुरुस्तीबाबत कोणतीही मागणी वैद्यकीय अधिकारी यांचेकडून जिल्हा परिषदेला प्राप्त झालेली नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयेला, ता.करवीर येथील मुख्य इमारतीची गळती रोखण्याकरिता इमारतीवर सिमेंट पत्र्याचे छप्पर घालण्यात आलेले आहे. या कामाचा एकूण खर्च रुपये २.७२ लाख अंदाजपत्रकास सन १९९९-२००० मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. सदरचे काम दिनांक २३ ऑक्टोबर,१९९९ रोजी पूर्ण झालेले आहे.

कार्यकारी अभियंता, बांधकाम व जिल्हा आरोग्य अधिकारी, यांनी पा.आ.केंद्र, भुयेला, ता.करवीर येथे दिनांक २६ डिसेंबर,२००० रोजी संयुक्त भेट दिली होती. त्यावेळी इमारतीची

पाहणी करुन दुरुस्तीच्या कामाचा आढावा घेण्यात आला. मुख्य इमारतीच्या भिंतीचे तडे, फरशी दुरुस्ती, दारे खिडक्या दुरुस्ती या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,४८,७७४ इतकी असून दिनांक २७ मार्च,२००१ रोजी काम सुरु झाले आणि दिनांक ११ मार्च,२००२ रोजी काम पूर्ण झाले. या कामावर रुपये २,४०,४३८ इतका खर्च झालेला आहे.

एकंदरीत मुख्य इमारतींची गळती काढण्याकरीता सिमेंट पत्रे छप्पर घालण्यात आलेले असून भिंतीची दुरुस्ती व दारे खिडक्यांची दुरुस्ती करण्यात येऊन फरशी बसविण्यात आलेली आहे. तसेच, वैद्यकीय निवासस्थान आणि एनएम/एएनएम/निवासस्थान इमारतीची संपूर्ण दुरुस्ती करण्यात येऊन सर्व इमारती वापरात आहेत.

समितीने केलेली शिफारस विचारात घेऊन सन २०००-२००१ मध्ये जिल्ह्यातील खालील आरोग्य संस्थांना कार्यकारी अभियंता व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी संयुक्तपणे भेटी दिलेल्या आहेत.

(१) प्रा.आ.केंद्र.भुयेला,ता.करवीर, दि.२६ डिसेंबर,२०००

(२) प्रा.आ.केंद्र.भुयेला,ता.करवीर, दि.२१ जुलै,२०००

या वित्तीय वर्षात प्रा.आ.केंद्र, आळते, ता.हातकणंगले, वडपगे, ता.करवीर, टाकळी, ता.शिरोळ, निवडे, ता.गगनबावडा या ठिकाणच्या मुख्य इमारतीच्या बांधकामासंदर्भात संयुक्तपणे भेटी देण्यात आलेल्या आहेत. तसेच पडळ, ता.पन्हाळा येथील मुख्य इमारतीच्या गळती संदर्भातही भेट देण्यात आलेली आहे.

संचालनालयातर्फे राज्यातील सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना दि.२३ जानेवारी,२००२ रोजी परिपत्रकाद्वारे जिल्हा आरोग्य अधिकारी व कार्यकारी अभियंता यांनी जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र बांधकामाच्या सद्य:स्थितीचा आढावा घेणे व ज्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या इमारतींना दुरुस्तीची आवश्यकता आहे ती कामे हाती घेऊन गुणात्मक दृष्ट्या पूर्ण करावीत तसेच दर तिमाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी व कार्यकारी अभियंता यांची संयुक्त बैठक घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीबाबतचा आढावा घेण्याबबातच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या.

संचालनालयातर्फे दि.९ जुलै,२००२ रोजीच्या पत्रान्वये वार्षिक योजना २००३-२००४ जिल्हास्तर योजना तयार करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करण्यात आलेली असून यामध्ये प्रत्येक प्रा.आ.केंद्र देखभाल दुरुस्तीकरिता रुपये ४५,००० वार्षिक निधी जिल्हा नियोजन विकास मंडळाकडून उपलब्ध करुन घेण्याच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तसेच दि.२० व २१ नोव्हेंबर,२००२ रोजी पुणे येथे सर्व कार्यक्रम प्रमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या संयुक्त सभेमध्ये सर्व अधिकारी यांना आरोग्य संस्थांच्या देखभाल दुरुस्तीकरिता जिल्हा नियोजन विकास मंडळाकडे निधी किती प्रमाणात मागण्यात यावा याबाबतचे सुध्दा मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

या शिफारशीसंदर्भात शासनाने लेखी कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत ग्रामविकास विभागाने असे नमूद केले आहे की, शासनाने सर्व मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग यांना कार्यवाहीचे निर्देश दिले होते. सा.बां.विभाग, जिल्हा परिषद व आरोग्य विभागामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रांची एकत्रित तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, बहुतांशी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारती बऱ्याच जुन्या आहेत व दुरुस्तीची आवश्यकता आहे. परंतु, देखभाल दुरुस्तीसाठी पुरेसा निधी प्राप्त होत नाही, उदाहरणादाखल काही जिल्ह्यांचे अहवाल खालीलप्रमाणे आहेत :---

यवतमाळ. --- प्रा.आ.केंद्रांच्या दारे खिडक्या दुरुस्ती, बाहेरील प्लास्टर, गळती थांबविणे, रंगरंगोटी, ऑपरेशन थिएटर दुरुस्ती इ. कामांसाठी रुपये ५३.९० लक्ष इतक्या अनुदानाची आवश्यकता आहे.

अकोला. --- फरशी दुरुस्ती , छत गळती, निवासस्थान दुरुस्ती, विद्युत पुरवठा दरुस्ती, बाथरुम दुरुस्ती इ.कामांसाठी रुपये ४९.७५ ला इतक्या अनुदानाची आवश्यकता आहे.

वाशिम. --- खिडक्यांची, दरवाज्यांची, फ्लोअरींग, कंपाऊंड वॉल, सेप्टीक टँक, वॉटर प्रुफींग इत्यादीसाठी रुपये ६२.०२ लक्ष अनुदानाची आवश्यकता आहे.

नागपूर. --- प्राथमिक आरोग्य केंद्राच्या निरीक्षण करण्यात आलेल्या सर्व नादुरुस्त इमारतींवर जलरोधक प्रक्रीया करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत छत गळती बाबत तक्रारी नाहीत.

भंडारा. --- सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतींची तपासणी करण्यात आली. १२ इमारतींची व निवासस्थानांची जलरोधक प्रक्रीया पूर्ण करण्यात आली. दरवर्षी वेळोवेळी निरीक्षण करण्यात येते.

समितीसमोर प्राप्त झालेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची दिनांक १२ जून,२००३ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, समितीने सूचना दिल्याप्रमाणे या ठिकाणी दुरुस्तीची कामे करण्यात आलेली आहेत. मुख्य इमारतीची दुरुस्ती, कंपाऊंडचे काम तसेच धर्मशाळेची दुरुस्ती झाली असल्याचे अहवाल कार्यकारी अभियंता यांनी दिलेला आहे.

सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीसमोर पुढीलप्रमाणे खुलासा केला :-

या ठिकाणी दोन खात्यांमार्फत कारवाई झालेली आहे. समितीची शिफारस आल्यामुळे शासनाने पूर्णपणे कामाकडे लक्ष दिलेले आहे. डिसेंबर,२००१ मध्ये मुख्य सचिवांकडे झालेल्या बैठकीमध्ये या विषयावर चर्चा झाली होती. जानेवारी,२००२ मध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी द्वारे सर्व जिल्हापरिषदांच्या कार्यकारी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या की, " प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दुरुस्तीसाठी किती खर्च होणार आहे, याची माहिती घ्यावी." मागच्या वर्षी नोव्हेंबरमध्ये झालेल्या बैठकीत राज्याच्या सर्व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना बोलावून माहिती घेण्यात आली. विभागाकडे जिल्हावार माहिती आहे. संपूर्ण राज्यामध्ये आरोग्य केंद्रांच्या दुरुस्तीसाठी जवळजवळ २० ते २१ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. आता एक नवीन प्रगती अशी झालेली आहे की, केंद्र सरकारकडून कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमासाठी ग्रामीण रुग्णालय व जिल्हा रुग्णालय या प्रत्येकाला जास्तीत जास्त १० लाख रुपये मिळू शकतील, अशी केंद्र शासनाची योजना आहे. मंत्रालयामध्ये एका सचिवांकडे हे काम देण्यात आलेले आहे. त्यांच्याकडून देखील याबाबत माहिती घेतली आहे. या ठिकाणी केंद्र शासनाने सवलत दिलेली आहे. एका जिल्ह्यामध्ये १० ग्रामीण रुग्णालये आहेत तर त्यांच्यासाठी केंद्र शासनाकडून १ कोटी रुपये मिळू शकतील. ही सर्व रक्कम प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीसाठी वापरता येईल. या बाबतचा पहिला शासन निर्णय रत्नागिरी जिल्ह्यासाठी १५ मार्चला काढण्यात आला आहे. त्यांच्यासाठी ४० लाख रुपये मंजूर झालेले आहेत. वास्तविक पहाता सर्वसाधारणपणे ग्रामीण रुग्णालयाच्या ज्या इमारती नवीन असतात, त्या ठिकाणी दुरुस्तीची फारशी आवश्यकता नसते. या दुरुस्तीच्या बाबतीत आढावे घेऊन प्रस्ताव पाठवावे असे सांगण्यात आलेले आहे. आता आपल्याकडे ४-५ जिल्ह्यांचे प्रस्ताव आलेले आहेत. त्या बाबतची माहिती माझ्याजवळ आहे. पुणे-१६ लाख रुपयांची मागणी केलेली आहे, २५ आरोग्य केंद्रे आहेत. सातारा-१५ या ठिकाणी १५ आरोग्य केंद्रे आहेत त्यांनी मागणी ९ लाख ९३ हजार रुपयांची केलेली आहे. कोल्हापूर-१११ आरोग्य केंद्रे आहेत. त्यांच्याकडून १ कोटी ११ लाख रुपयांची मागणी केलेली आहे. नाशिक येथे ४ आरोग्य केंद्रासाठी ६० हजार रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. नांदेड येथे २५ हजार रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. सोलापूरचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. प्रस्तावाबरोबर त्यांनी अंदाजपत्रक पाठविणे आवश्यक असते.

अभिप्राय व शिफारस :

साक्षीच्या वेळी समितीला मिळालेल्या माहितीनुसार शासनाने सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांना प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीच्या संदर्भात कार्यवाही करण्याचे निदेश दिलेले आहेत. तसेच जिल्हा परिषद व आरोग्य विभागामार्फत राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची एकत्रित तपासणी केली असता बहुतांशी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारती जुन्या झाल्या असून त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी पुरेसा निधी उपलब्ध होत नाही त्यामुळे दुरावस्थेतील इमारतीमधूनच आरोग्य सेवा सुरु ठेवण्यात आलेली आहे. या नादुरुस्त व गळक्या इमारतींची तातडीने दुरुस्तीची कामे करण्याची आवश्यकता आहे. पुढील जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरुस्तीची कामे करण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे त्याची माहिती पुढील प्रमाणे आहे. यवतमाळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीला दारे-खिडक्या बसविणे, बाहेरील प्लास्टर, गळती थांबविणे, रंगरंगोटी इत्यादी कामांसाठी रुपये ५३.९० लाख इतक्या अनुदानाची मागणी केलेली आहे. अकोला प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी रुपये १९.७५ लाख, पुणे १६ लाख, सातारा ९ लाख ९३ हजार, कोल्हापूर१ कोटी ११ लाख, नाशिक ६० हजार, नांदेड २५ हजार इतक्या अनुदानाच्या मागणीचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेले आहेत. सोलापूरच्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी सुध्दा आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण जनतेला औषधोपचारासाठी प्रथम प्राथमिक आरोग्य केंद्रात जावे लागते. या प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारती चांगल्या स्थितीत राहण्यासाठी त्या इमारतींची वेळोवेळी देखभाल दुरुस्ती करण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे, असे समितीचे मत आहे. शासनाकडे यवतमाळ, अकोला, सातारा, पुणे, कोल्हापूर, नाशिक, नांदेड आणि सोलापूर येथील जिल्हा परिषदांकडून प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या दुरुस्तीच्या कामांसाठी आवश्यक असलेला निधी मिळावा म्हणून जे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत त्यांचा पाठपुरावा करुन त्यानुसार तात्काळ कामे हाती घेण्यात यावीत व त्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे, त्याची माहिती समितीला तीन महिन्यांत सादर करावी.

तीन : गडहिंग्लज तालुक्यातील ६ पाझर तलावांची अपूर्ण असलेली कामे : जिल्हा परिषद, कोल्हापूर

समितीला प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे दिसून आले की, गडहिंग्लज तालुक्यात कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत सन १९८० ते १९८५ या कालावधीत जी सहा पाझर तलावांची कामे हाती घेण्यात आली ती केवळ त्या भागात माती उपलब्ध नसल्याने अद्यापही अपूर्ण आहेत. ही कामे सुरु करण्यापूर्वी राज्यस्तर यंत्रणेकडून त्याचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. तथापि, पाझर तलावांच्या बांधकामास आवश्यक ती माती तेथे जवळपास उपलब्ध होईल वा नाही हे पाहण्याची खबरदारी संबंधित कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी घेतलेली नाही. परिणामी या सहाही कामांवरील खर्च पूर्णत: वाया गेला असून हा खर्च निर्लेखित करण्याशिवाय शासनाला कोणताही तराणोपाय राहिलेला नाही. यावरुन अधिकाऱ्यांनी पाहणी न करताच अहवाल तयार केला हे स्पष्ट आहे. समितीच्या मते अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे शासनाचे असे लाखो रुपयांचे नुकसान होणे ही अत्यंत खेदाची बाब आहे. अशा अधिकाऱ्यांना कार्यवाही न करता सोडून दिल्यास प्रशासनात एक चुकीचा संदेश जाईल व यंत्रणा बेफिकीर व बेजबाबदार राहील. सबब साक्षीच्यावेळी विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केल्याप्रमाणे या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला विनाविलंब पाठविण्यात यावा अशी समितीने दुसऱ्या अहवालात शिफारस केली होती.

या शिफारशींसंबंधात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत ग्रामविकास विभागाने असे नमूद केले की, सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे अहवालानुसार जिल्हा परिषदेने चार शाखा अभियंता यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात आली नाही.

सदर पाझर तलावांचे मूळ सर्वेक्षण व अंदाजपत्रक पाटबंधारे विभागाच्या यंत्रणेने तयार केलेले असल्याने सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरीता पाटबंधारे विभागाला दि.७ मे,२००३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

पाटबंधारे विभागाकडून ६ पाझर तलावाच्या अपूर्ण असलेल्या कामाबाबत खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे :-

पाटबंधारे खात्यांचे कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर अंतर्गत लघु पाटबंधारे विभाग, कोल्हापूर यांचेमार्फत पुढील ५ पाझर तलावांचे सर्वेक्षण करुन अंदाजपत्रके सन १९८० ते १९८५ या कालावधीत तयार करुन जिल्हा परिषद यंत्रणेकडे पाठविण्यात आलेली होती.

(१) हसूर बु.ता.कागल.

(२) बेकनाळ क्र.१, ता.गडहिंग्लज

(३) हलकर्णी क्र.१, ता.गडहिंग्लज

(४) मनवाड, ता.गडहिंग्लज

(५) कडगांव क्र.२, ता.गडहिंग्लज

(६) तळेवाडी, ता.गडहिंग्लज येथील पाझर तलावांचे सर्वेक्षण व अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे सर्वेक्षण विभाग (स्थानिक स्तर) सातारा (तत्कालीन) यांनी सन १९७३-७४ चे दरम्यान तयार केले आहे.

ज्यांनी कामाचा सर्वेक्षण केला व अंदाजपत्रके तयार केली, त्यांना मान्यता दिली आणि कामाला प्रत्यक्ष सुरुवात केली अशा दोघावरही कारवाई करण्यास सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांनी संमती दर्शविली व या संदर्भात चौकशी सुरु होईल तेव्हा कोणाही अधिकाऱ्याला कसलीही पळवाट मिळू नये, म्हणून सर्वच बाबी तपासून घेऊ असे आश्वासन दिले या संबंधात योग्य ती कारवाई करण्याबाबत जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून या कार्यालयास दिनांक १ मार्च,२००० चे पत्रान्वये कळविण्यात आले.

त्याबाबत मंडळ कार्यालयाने दिनांक १६ जून,२००० व दिनांक १४ जानेवारी २००२ अन्वये जिल्हा परिषदेकडून खुलासे वजा अधिक माहिती मागवणेत आलेली आहे. त्यातील पहिल्या पत्राबाबतचा खुलासा जिल्हा परिषदेकडून दिनांक ३ नोव्हेंबर,२००१ चे पत्रान्वये प्राप्त झाला. तथापि, दुसऱ्या पत्रान्वये मागविणेत आलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. पुनश्च मंडळ कार्यालयाचे दिनांक १२ मे २००३ चे पत्रान्वये सहा पाझर तलावांचे कामाबाबत प्रपत्रात माहिती सादर करणेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांना कळविण्यात आले. त्यानुसार जिल्हा परिषदेकडून दिनांक १५ मे,२००३ अन्वये माहिती प्राप्त झाली असून सदर माहितीनुसार अहवालामध्ये तपशिल नमूद केलेला आहे.

दिनांक २२,२३ व २४ नोव्हेंबर २००१ च्या बैठकीमधील कार्यवृत्तांतामध्ये काळी माती पाझर तलावात उपलब्ध नाही त्यामुळे सुधारित अंदाजपत्रक तयार करावे लागले आहे. हे जे काम आहे ते १९८०-८१ चे आहे. काम सुरु झाले तेव्हा काळी माती जवळपास उपलब्ध नसल्याने लांब अंतरावरुन आणावी लागली व त्यामुळे अंदाजपत्रकीय किंमत वाढून योजना मापदंडात बसल्या नाहीत असा उल्लेख आहे.

आता शासनाने दिनांक ८ मे २००३ चे पत्रान्वये मंडळ कार्यालयाने दिनांक १४जानेवारी २००२ रोजी उपस्थित केलेल्या मुद्यांवर जरी पाझर तलावांचे कामाचे, जिल्हा परिषदेच्या

अभियंत्यांनी पून्हा सर्वेक्षण करुन अंदाजपत्रके तयार केली असली तरी मूळ सर्वेक्षण व अंदाजपत्रके तयार केलेल्या यंत्रणेने सदर पाझर तलावाचे क्षेत्रात माती उपलब्ध होते किंवा कसे याबाबत अभिप्राय नोंदविणे आवश्यक होते. तरी अभिप्राय संबंधित अधिकाऱ्याने नोंदविले नसल्याने मूळ अंदाजपत्रक तयार करणारी यंत्रणा जबाबदार आहे.

वरील आदेशानुसार विषयांकित प्रकरणी उपलब्ध कागदपत्रावरुन खालीलप्रमाणे निष्कर्ष निदर्शनास येतात.

(१) **हसूर बु.ता.कागल :-** या पाझर तलावाचे अंदाजपत्रक (किंमत रुपये ५.५० लक्ष) सन १९८०-८१ चे दरसूचीनुसार तयार करुन सन १९८२ मध्ये जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आले. या अंदाजपत्रकामध्ये माती उपलब्ध नसल्याने सरपंच, मौजे हसूर बुद्रुक यांनी जवळच्या खाजगी क्षेत्रातून माती उपलब्ध करुन देऊ असे लेखी पत्र दिलेले आहे व ते पत्र अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट कलेले आहे. सदरचे काम रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर होते तथापी मजूर उपलब्ध होत नसल्याने सरपंच हसूर बु. यांचे मागणीनुसार सदरचे काम शासकीय अनुदानातून घेणेबाबत सन १९८७-८८ मध्ये मागणी केली होती. त्यानुसार सदर पाझर तलावाचे जिल्हा परिषदे मार्फत सुधारित अंदाजपत्रक (किंमत रुपये ८.५२ लक्ष) तयार करुन नोव्हेंबर १९८८ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली व मार्च १९८९ अखेरपर्यंत अ.१ निविदेद्वारे सदर पाझर तलावाची प्राथमिक स्वरुपात कामे करण्यात आली. तद्नंतर सदर पाझर तलावास पर्यायी वन जमिनीच्या अडचणीमुळे विलंब झाल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्या अहवालानुसार दिसून येते.

(२) **बेकनाळ क्र.१, ता.गडहिंग्लज :-** या पाझर तलावाचे अंदाजपत्रक (किंमत रुपये ७.५८ लक्ष) सन १९८०-८१ च्या दरसूचीवर तयार करुन १९८१ मध्ये जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आलेले होते. सदर पाझर तलावास जिल्हा परिषदेमार्फत ऑक्टोबर १९८२ मध्ये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देऊन ब-१ निविदेद्वारे मार्च १९८३ मध्ये कामास सुरुवात केली होती. तद्नंतर बुडित क्षेत्रात पुरेशी माती उपलब्ध नसल्याचे कारण सांगून ठेकेदाराने १९८५ पासून काम बंद ठेवले कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्या अहवालानुसार बेकनाळ क्र.१ पाझर तलावास माती उपलब्ध करुन दिली तरीही ठेकेदाराने विलंबाने माती उपलब्ध करुन दिल्याच्या कारणास्तव जादा दराचे मागणीसाठी काम करण्यास नकार दिल्याचे दिसून येते. तसेच काम पूर्ण करण्यातील अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने

खात्याने जरूर ते सर्व सहकार्य देऊनही ठेकेदार याने काम पूर्ण करण्यामध्ये टाळाटाळ केल्याने ठेकेदार यांचेकडून निविदा कलम ३ क अन्वये जून १९८६ मध्ये काम काढून घेण्यात आले. त्यामुळे या कामाचे बाबत अंदाजपत्रकातील त्रुटीचा संबंध येत नाही. तद्नंतर फेब्रुवारी १९८७ मध्ये जिल्हा परिषदेचा ठराव घेऊन अ.१ निविदेद्वारे खाजगी माती उपलब्धतेसाठी खाजगी शेतकऱ्यांची संमती घेऊन काम चालू केले. तथापि अ.१ निविदेवरील ठेकेदारांने योग्य प्रगती दाखवली नसल्याने नोव्हेंबर १९८९ पासून काम बंद पाडलेले आहे. सबब माती उपलब्धते अभावी काम थांबून राहिले अशी वस्तुस्थिती नाही.

(३) **हलकर्णी पाझर तलाव ता.गडहिंग्लज :-** या पाझर तलावाचे अंदाजपत्रक (किंमत रुपये ८.८८ लक्ष) सन १९८०-८१ च्या दरसूचीनुसार तयार करुन १९८२ मध्ये जिल्हा परिषदेकडे पाठविणेत आले. तथापि संबंधित जमीन मालकाचे अडथळ्यामुळे सदर पाझर तलावाचे काम चालू करता आले नाही. तद्नंतर भूसंपादन प्रस्ताव तयार करुन भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाल्यावर सन १९८६-८७ मध्ये जमीन ताब्यात मिळाल्या. तद्नंतर जिल्हा परिषदेमार्फत सदर तलावासाठी सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण करुन तलावाचे सुधारित अंदाजपत्रक (किंमत रुपये १४.८१ लक्ष) सन १९८६-८७ च्या दरसूचीनुसार तयार करुन एप्रिल १९८८ मध्ये अधिक्षक अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर यांचेकडून तांत्रिक मंजुरी घेऊन जिल्हा परिषदेमार्फत १०-१९८८ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली म्हणजेच जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत सविस्तर सर्वेक्षण अन्वेषण करुन सुधारित अंदाजपत्रक केल्यानंतरच अ.१ निविदेद्वारे सदरचे काम चालू केले. तथापी सन १९९०-९१ पासून गाभा भरावासाठी माती उपलब्ध होत नाही या कारणास्तव काम अपूर्ण अवस्थेत बंद आहे. कामापैकी धरणाची पाया खोदाई, निचरा चर, जलरोधक खोदकाम व भरीव काम, रॉक टो व दोन्ही बाजुचे भरावाचे काही काम अशी कामे झालेली आहेत. या कामावर अंदाजे २४ टक्के खर्च झालेला आहे. वास्तविक काम चालू करण्यापूर्वीच मातीच्या उपलब्धतेबाबत तपासणी करुन त्या प्रमाणे निविदा कागदपत्र करणे आवश्यक होते. परंतु तसे न झाल्यामुळे मातीच्या खाणीच्या जागेकरिता नंतर भूसंपादन प्रस्ताव सादर केल्याचे दिसून येते. व भूसंपादनाच्या अडचणीमुळे काम थांबल्याचे दिसून येते. सबब काम चालू करण्यापूर्वी जिल्हा परिषदेकडून यथोचित कार्यवाही झाली नाही, असे दिसून येते.

(४) **मनवाड पाझर तलाव ता.गडहिंग्लज :-** सदर तलावाचे अंदाजपत्रक (किंमत रुपये ६.४८ लक्ष) सन १९८०-८१ च्या दरसूचनीनुसार तयार करुन जानेवारी १९८२ मध्ये जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आले. काम सुरु

करणेपूर्वी जिल्हा परिषदेकडील क्षेत्रिय अभियंता यांनी बुडित क्षेत्रांची पहाणी करुन बुडीत क्षेत्राचा गाभा भरावासाठी आवश्यक त्या प्रमाणात माती उपलब्ध नसल्याने ३० ऑक्टोबर १९८२ व ११ फेब्रुवारी १९८८ अन्वये कळविलेले होते व त्या अनुषंगाने खाजगी शेतकऱ्यांकडून संमती घेऊन आवश्यक ते वाहन अंतर घरुन सुधारीत अंदाजपत्रक (किंमत १०.४८ लक्ष) सन १९८८-८९ चे दरसूचीनुसार तयार केले व त्यास मंजुरी घेऊन अ-१ निविदेमार्फत काम सुरु केले व त्यानुसार झालेल्या कामावर रुपये २.८१ लक्ष इतका खर्च करणेत आला. १ निविदेतील प्रस्तावित काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित कामाची ब.१ निविदा प्रसिध्द करण्यात आली. परंतु त्यास प्रतिसाद न मिळाल्याने काम पुन्हा सुरु झालेले नाही. तसेच त्यानंतर खाजगी शेतकऱ्यांनी माती उपलब्ध नसल्याचे व खाजगी शेतकऱ्यांकडून संमती घेऊन सुधारीत अंदाजपत्रक केल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अहवालामध्ये नमुद केले आहे. सबब माती उपलब्ध नसल्याने वा मापदंडाच्या अनुषंगाने काम थांबून राहीले अशी वस्तुस्थिती नाही.

(५) **कडगाव, ता.गडहिंग्लज :-** या पाझर तलावाचे अंदाजपत्रक (किंमत रुपये ८.७८ लक्ष) सन १९८३-८४ च्या दरसूचीनुसार तयार करुन जिल्हा परिषदेकडे पाठविणेत आले. सदर अंदाजपत्रकात डोंगराळ भागासाठी ५ टक्के जादा तरतूद धरुन रुपये ९.९७ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रकास जिल्हापरिषदेकडून (का.अ.ल.ज.सिं. विभाग, कोल्हापूर) तांत्रिक मान्यता देणेत आली. तथपि तांत्रिक मान्यता देतेवेळी पाझर तलावास आवश्यक असणारे बांधकाम साहित्याच्या उपलब्धतेबाबत सविस्तर पडताळणी करुन सुधारित अंदाजपत्रक करणे आवश्यक होते. सदर पाझर तलावास मार्च १९८५ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर तलावाचे काम ब.१ निविदा निश्चित होईपर्यंत अ.१ निविदेवर काम चालू केले. व त्यावर रुपये १.६१ लक्ष इतका खर्च करणेत आला. या कामासाठी काढणेत आलेल्या ब.१ निविदेस प्रतिसाद मिळाला नाही म्हणून अ.१ निविदेवर काम करण्यात आले. त्यानुसार कामावर एकूण रुपये २.५९ लक्ष खर्च करणेत आला. तद्नंतर १९९३ मध्ये माती खाणीसाठी भूसंपादन प्रस्ताव तयार करुन सादर करण्यात आला. सन १९९९-२००० दरसूचीनुसार पाझर तलावाचे सुमारे १५ वर्षानंतर सुधारित अंदाजपत्रक मापदंडात बसत नसल्याने विशेष बाब म्हणून मान्यतेसाठी शासनास मे,२००१ मध्ये शासनास सादर केलेले आहे. सन १९९३ ऐवजी १९८५ मध्ये सर्व खबरदारी घेऊन अंदाजपत्रक करणे आवश्यक होते. याकडे संबंधित जिल्हा परिषद अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होते. सबब माती उपलब्ध नसल्याचे कारण ही वस्तुस्थिती नाही.

(६) **तळेवाडी पाझर तलाव ता.गडहिंग्लज:-** या पाझर तलावाचे अंदाजपत्रक (किंमत रुपये २.५२लक्ष) सन १९७३-७४ च्या दरसूचीनुसार तयार करुन जिल्हा परिषदेकडे

पाठविणेत आले.जिल्हा परिषदेने सन १९७२- ७३ च्या दुष्काळी कालावधीत सदर तलावाचे काम हाती घेतले. सदरचा दुष्काळ कालावधी संपल्यानंतर सन १९७९-८० मध्ये जिल्हा परिषदेमार्फत तलावाचे सुधारित अंदाजपत्रक (किंमत रुपये ४.९० लक्ष) सन १९७९-८० च्या दरसूचीनुसार तयार करणेत आले. व त्यानुसार शासकीय अनुदानातून अ.१ निविदेमार्फत काम सुरु केले. सदरचे काम १९८५-८६ अखेरपर्यंत प्रगतीपथावर होते. तद्नंतर धरणासाठी लागणारे साहित्य अंदाजपत्रकातील वाहन अंतरावर उपलब्ध होत नसल्याच्या कारणास्तव बंद पडले. त्यामुळे पुनश्च धरणासाठी लागणाऱ्या साहित्याचे वाहन अंतर वाढवून सन १९८६-८७ च्या दरसूचीनुसार रुपये ९.७५ लक्ष किंमतीचे द्वितीय सुधारीत अंदाजपत्रक जिल्हा परिषदेमार्फत करणेत आले. त्यानुसार सन १९८८,१९८९ व १९९० या वर्षांमध्ये तीन वेळेला ब.१ निविदा बोलावण्यात आल्या. तीनही वेळेला प्रतिसाद न मिळाल्याने ब.१ निविदा निश्चित होईपर्यंत अ.१ निविदेमार्फत काम करण्यात आले. या कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकानुसार हे काम मापदंडात बसत आहे. परंतु वनखात्याच्या अडथळ्यामुळे काम सुरु करता येत नाही. वनप्रस्तावाची शेरे पूर्ततेचे काम सध्या चालू आहे असा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी सादर केलेला आहे.

पाझर तलावांची किंवा अन्य पाटबंधारे प्रकल्पांची कामाची पध्दत अशी असते कि, प्रथम प्रशासकीय मान्यतेसाठी प्रकल्पाच्या सुरुवातीला प्राथमिक सर्वेक्षण करुन प्राथमिक अंदाजपत्रके तयार केली जातात. या मध्ये प्रकल्पाच्या कामासाठी लागणारे साहित्य, वाहन अंतरे या विषयी सर्वसाधारणपणे ढोबळ अंदाज रुन अंदाजपत्रके केली जातात. व त्यानंतर म्हणजेच प्रशासकीय मान्यतेनंतर प्रत्यक्ष काम हाती घेण्यापूर्वी सविस्तर अंदाजपत्रके तयार केली जातात. व त्यानुसार निविदेद्वारे काम करण्याचे ठरवल्यास प्रकल्पासाठी लागणाऱ्या साहित्याबाबत सखोल तपासणी करुन त्याप्रमाणे कामासाठी तांत्रिक मंजुरी देण्यात येते. व त्यानंतर निविदा कागदपत्रे कली जातात. प्रकल्पासाठी लागणारे गाभा भराव, कवच भराव, दगड इत्यादि साहित्य उपलब्धतेसबंधी निविदा कागदपत्रांमध्ये स्पष्टीकरण केले जाते. व त्यानुसार पुढील काम पूर्ण केले जाते. सबब वरील ६ पाझर तलावांच्यापैकी ज्या पाझर तलावांचे (बेकनाळ क्र.२) कामे वरीलप्रमाणे ब-१ निविदेवर हाती घेण्यात आली. ती कामे पूर्ण करण्याची जबाबदारी कंत्राटदारांची होती. परंतु कंत्राटदाराच्या कामे न करण्याच्या/टाळाटाळ करण्याच्या व अर्धवट सोडण्याच्या कारणांमुळे ही कामे पूर्ण होऊ शकलेली नाहीत. या मध्ये कोणत्याही अभियंत्यांच्या (पाटबंधारे किंवा जिल्हा परिषदेकडील) संबंध पोहोचत नाही किंवा त्यात त्यांना दोषी समजता येणार नाही. परंतु ब-१ निविदेवरील कामे ठेकेदारांच्या जबाबदारीवर पूर्ण करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी यांचेकडे राहते.

ज्या कामांवर तलावाचे भरावासाठी माती उपलब्ध असूनसुध्दा वनजमिनीच्या कारणामुळे जी कामे होऊ शकली नाहीत किंवा प्रलंबित राहिलेली आहेत त्यासाठी सुध्दा कोणत्याही अभियंत्यास जबाबदार धरता येणार नाही.

परंतु वरील सर्व कामे चालू करण्यापूर्वी साहित्याच्या उपलब्धतेबाबत सखोल तपासणी करुन मगच ग-१ किंवा अ-१ निविदेवर कामे हाती घेणे आवश्यक होते. तसे जिल्हा परिषदेकडील अभियंत्यांच्याकडून कार्यवाही अपेक्षित होती. जर तसे वेळीच झाले असते तर मापदंडाच्या अनुषंगाने किंवा साहित्य उपलब्धतेच्या अनुषंगाने वेळीच तपासणी झाली असती. तसेच हलकणी व मनवाड या पाझर तलावांची कामे हाती घेणेपूर्वी गाभ्यासाठी माती उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येऊनही ही कामे हाती घेण्यात आलेली आहेत.

शासन पाटबंधारे विभाग यांचे परिपत्रक क्रमांक एमएमएस १०७९ (८४९) लपा (१) दिनांक १८ मे,१९७९ द्वारे ल.पा. योजनांचे सर्वेक्षण व प्रत्यक्ष काम सुरु करणे संबंधी सूचना या विषयाच्या अनुषंगाने शासनाद्वारे अशा सूचना निर्गमीत केल्या आहेत की "प्रत्यक्ष कामाची जबाबदारी असणाऱ्या अधिकाऱ्यांनीही योजनेच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यापूर्वी योजनेत तांत्रिकदृष्ट्या काही ढोबळ चूक नाही व योजना खरोखरच व्यवहार्य आहे की नाही याची पूर्ण खात्री करुन मगच योजनेच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करावी". सबब वरील सर्व योजनांच्या बाबत जिल्हा परिषदेकडून प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करण्यापूर्वी संबंधित कामांची तांत्रिदृष्ट्या सखोल तपासणी करणे आवश्यक होते. याचा विचार करता पाटबंधारे खात्यातील कर्मचारी/अधिकारी वरील विषयांत दोषी ठरत नाहीत तसेच पाटबंधारे खात्याकडील अभियंत्यांनी जी प्राथमिक सर्वेक्षण करुन अंदाजपत्रके तयार केलीत व प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हा परिषद यांचेकडे सादर केली आहेत त्याविषयी आता १५ ते २० वर्षांनंतर काही तलावांचेबाबत भरावासाठी माती नसल्याचे कारण उपस्थित करुन त्यांना दोषी ठरविणे योग्य ठरत नाही.

त्या अनुषंगाने जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी लेखी स्वरुपात पाठविलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे :-

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील क्र.पंरास २९९-प्र.क्र.७२-जल-३, दि.२१/६/२००३ च्या पत्रास अनुसरुन विभागाकडून गडहिंग्लज तालुक्यातील ५ व कागल तालुक्यातील १ अशा काम सुरु होऊन बंद अवस्थेमध्ये पडलेल्या एकूण ६ पाझर तलाव कामांच्या, संधारित अंदाजपत्रक व वन जमीन संपादन प्रस्तावांच्या प्रगतीबाबतची माहिती उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय यांच्याकडे इकडील पत्र क्र.कोजिप/ग्रापापुवि/प्रकल्प/९६९-२००३, दि.१४/७/२००३ च्या पत्रान्वये पाठविण्यात आलेली आहे.

तसेच, महाराष्ट्र शासन, पाटबंधारे खात्याकडील क्र.पंरास १००३- (१३३-२००३)/लपा-१ दि.११ ऑगस्ट,२००३ च्या पत्रास अनुसरुन अशाच आशयाची पाझर तलाव सुधारीत अंदाजपत्रक व नव जमीन संपादन प्रस्तावांचे प्रगतीबाबतची माहिती अवर सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे इकडील पत्र क्र.जि.प./ग्रापापुवि/प्रकल्प/१२३१-२००३, दि.८ सप्टेंबर,२००३ च्या पत्रान्वये पाठविण्यात आलेली आहे.

तथापि, उप सचिव,ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून त्यांच्याकडील क्र.पंरास २९९-प्र.क्र.७२-जल-३, दि.१३ ऑगस्ट,२००३ च्या पत्रान्वये (सदर पत्र या विभागास दि.२ सप्टेंबर,२००३ रोजी प्राप्त झालेले आहे.) काम सुरु होऊन अपूर्ण अवस्थेमध्ये बंद पडलेल्या ६ पाझर तलावांची कामे त्वरित पूर्ण करण्याकरिता जिल्हा परिषद, कोल्हापूरकडून कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्त.) विभाग, कोल्हापूर यांच्याकडे ठेव तत्त्वावर तातडीने वर्ग करण्याबाबत कळविले आहे.

उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांच्या वर नमूद केलेल्या दि.१३ ऑगस्ट,२००३ च्या पत्रातील आशयानुसार अपूर्ण अवस्थेमध्ये बंद पडलेल्या गडहिंग्लज तालुक्यातील ५ व कागल तालुक्यातील १ अशा एकूण ६ पाझर तलाव कामांची चौकशी मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) पुणे यांच्याकडून करण्यात येवून त्यांच्याकडून सदर ६ पाझर तलावांची कामे त्वरीत पूर्ण करण्याकरिता जिल्हा परिषद, कोल्हापूरकडून कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) कोल्हापूर यांच्याकडे ठेव-तत्वावर वर्ग करण्याबाबत. त्यांच्याकडील (मुख्य अभियंता यांच्याकडील) दि.२२ जुलै,२००३ च्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केलेला आहे.

त्यास अनुसरुन वर नमूद केलेल्या उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दि.१३ ऑगस्ट,२०१३ च्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडील सदर ६ पाझर तलावांची कामे ठेव-तत्त्वावर कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, कोल्हापूर यांच्याकडे वर्ग करण्याचा प्रस्ताव तयार करुन कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्था.स्त.) विभाग, कोल्हापूर यांच्याकडे इकडील पत्र क्र.जिप/ग्रापापुवि/प्रकल्प/१२९९-२००३, दि.२४ सप्टेंबर,२००३ च्या पत्रान्वये पाठविण्यात आलेला आहे.

समितीला जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्याकडून पुढीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झालेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील ६ पाझर तलावांची मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्त.) पुणे यांनी चौकशी करुन दि.२२ जुलै,२००३ रोजी अहवाल सादर केला. सदर अहवालानुसार सहा पाझर तलावांची कामे अपूर्ण राहण्यामसगे जिल्हा परिषदेकडील अधिकारी जबाबदार आहे. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या अखत्यारीतील

सदरची कामे असून सदर विभाग हा मुख्यत: ग्रामीण विभागातील पाणीपुरवठ्याची कामे, देखभाल व दुरुस्ती या संबंधी कार्यान्वित आहे. त्यामुळे लघु सिंचन प्रकल्पावर म्हणावे तसे लक्ष दिले जात नाही. सदरची अपूर्ण कामे त्वरित पुर्ण करण्याकरिता लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, कोल्हापूर यांचेकडे हस्तांतरण करणे योग्य होईल. त्यानुसार सदर पाझर तलावाची कामे कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, कोल्हापूर यांच्याकडे वर्ग करण्याबाबत कार्यवाही करण्यात येते आहे. सदर पाझर तलाव (स्था.स्तर) विभागाकडे वर्ग झाल्यावर त्यांची कामे पूर्ण करण्याकरीता कार्यवाही करण्यात येईल.

सहा पाझर तलावांच्या अपूर्ण असलेल्या कामांच्या संदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १२ जून,२००३ रोजी सचिव, पाटबंधारे विभाग यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिव, पाटबंधारे यांनी समितीसमोर पुढीलप्रमाणे खुलासा केला. कोल्हापूर जिल्ह्यातील या पाझर तलावांच्या अपूर्ण असलेल्या कामांबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, या संदर्भात जिल्हा परिषद स्तरावर कारवाई सुरु असून राज्य स्तरावर ज्यांनी सर्व्हे केला आहे त्या पाटबंधारे विभागाच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी असा प्रस्ताव विभागाने पाठविला आहे. या पाझर तलावांचे सर्वेक्षण व्यवस्थित झालेले नसल्यामुळेच ही सहा कामे अर्धवट राहिलेली आहेत. त्यापैकी ४ कामे गडहिंग्लजमधील असून प्रत्येकी एक काम कागल आणि तळेवाडी येथील पाझर तलावाचे आहे. मागील बैठकीमध्ये देखील या संबंधात साक्ष झाली होती तेव्हा संबंधित कार्यकारी अभियंता यांनी माहिती दिलेली होती. श्री.काळे, कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद यांनी अशी माहिती दिली होती की, काळी माती न लागल्यामुळे सुधारित अंदाजपत्रक तयार करावे लागले. पण केवळ काळी माती अशी पाझर तलावासाठी वापरत नाही. काळी माती हा अर्थ त्यामध्ये अभिप्रेत नाही. उलट काळी माती आपण तेथे वापरतच नाही तर लाल माती वापरु शकतो. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मॅन्युअलमध्ये ज्या प्रकारची माती उपलब्ध आहे त्यातील चांगल्या प्रतीची माती वापरु शकता असे आहे त्यानुसार खरे तर येथे काम व्हायला पाहिजे होते. आता गडहिंग्लज भागातील प्रतिनिधी येथे उपस्थित असतील त्यांना याची माहिती आहे की, त्या भागात काळी माती नसते तर लाल माती असते आणि ती माती देखील यासाठी वापरु शकले असते, वापरता येते. तेव्हा केवळ काळी माती नव्हती असे म्हणून चालणार नाही. माझ्याकडे हा विषय आल्यावर मी याबाबतची वस्तुस्थिती संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली आहे त्यानुसार या सहा पाझर तलावांची कामे प्रत्यक्षात वेगवेगळ्या कारणास्तव बंद पडली आहेत. त्याची माहिती मी समितीसमोर देऊ इच्छितो. त्यातील हसूर बु. येथील पाझर तलावाचे काम डिसेंबर,१९९८ मध्ये सुरु झाले होते त्यामध्ये पर्यायी वन जमीन मिळाली नाही म्हणून ते काम बंद पडले आहे. म्हणजे या सहा पाझर तलावांच्या बाबतीत काळी माती मिळाली नाही असे एकच कारण दिले आहे तशी वस्तुस्थिती नव्हती. तर एका प्रकरणात पर्यायी वन जमीन न मिळाल्याने काम बंद पडले होते.

अशा प्रकारे आपल्या पाटबंधारे विभागाचे बरेच प्रकल्प वन जमिनीमुळे अडून पडले आहेत. हसूर बुद्रुक पाझर तलावाच्या कामावर ८० हजार रुपये खर्च झालेले आहेत अशी समितीला माहिती दिली. दुसरे बेकनाळे पाझर तलावाचे काम मार्च १९८३ मध्ये घेतले होते तेथे पुरेशी माती उपलब्ध नसल्याने आणि ठेकेदाराला माती उपलब्ध करुन दिल्यानंतरही ठेकेदाराने कामे करण्यास टाळाटाळ केली व काम बंद ठेवले. तिसरे काम हलकर्णी येथील पाझर तलावाचे सन १९८८ साली दिले होते परंतु भूसंपादनामुळे हे काम बंद पडले तेथील खाणीच्या कामामध्ये काही समस्या निर्माण झाल्या त्यामुळे तो प्रश्न अजूनही सुटलेला नाही. चौथे काम हे मनवाड पाझर तलावाचे असून सन १९८८-८९ मध्ये ए-१ निविदेमध्ये काम केले आहे. खाजगी वाटाघाटीने काम करताना शेतकऱ्यांनी माती देण्यास नकार दिला. म्हणजे तेथे माती उपलब्ध आहे पण शेतकऱ्यांनी अडविल्यामुळे काम बंद पडले आहे. त्यानंतर पाचवे काम कडगाव पाझर तलावाचे सन १९८५ मध्ये हे काम सुरु झाले आणि तेथेही भूसंपादन प्रस्ताव तयार केला पण कामाची किंमतच पूर्णपणे वाढल्यामुळे काम बंद पडले. त्यानंतर सहावे काम तळेवाडी येथील पाझर तलावाचे आहे. हे सन १९७२ चे काम असून १९८० साली हे काम सुरु झाले. वन खात्याची मंजुरी नसल्यामुळे हे काम होऊ शकले नाही. तेव्हा ही कामे बंद पडलेली आहेत हे मात्र खरे आहे. या सहा पाझर तलावांवर एकूण १६ लाख ७५ हजार रुपयांचा खर्च झोलेला आहे. ही पाझर तलावाची कामे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन सुरु करणे शक्य आहे काय हे पाहिले असता केवळ एकच पाझर तलाव मापदंडामध्ये बसला. बाकीचे पाझर तलाव मापदंडामध्ये बसले नाहीत. प्रस्तुत प्रकरणामध्ये जिल्हा परिषदेच्या शाखा अभियंत्याविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता आणि उप अभियंता यांनी सर्व्हे आणि सविस्तर अंदाजपत्रक तयार केले. माती उपलब्ध होती किंवा नाही हे त्यावेळी रेकॉर्डवर आलेली नाही. त्यामुळे सर्व्हे आणि एस्टिमेट करणारे अधिकारी आणि बजावणी करणारे जिल्हा परिषदेचे अधिकारी यांचा या प्रकरणामध्ये दोष आहे. जिल्हा परिषदेचे शाखा अभियंता या प्रकरणाशी संबंधित होते. त्यामुळे त्यांच्याविरुध्द कारवाई करणे अपेक्षित होते. म्हणून त्यांचे स्पष्टीकरण मागविण्यात आले, चौकशी अधिकारी नेमून त्यांची चौकशी करण्यात आली. संबंधित शाखा अभियंत्यांनी माती उपलब्ध नाही. त्यामुळे काम करणे शक्य नाही असे कळविले होते. त्यामुळे ज्या अधिकाऱ्यांनी सर्व्हे आणि एस्टीमेट केले त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत गडहिंग्लज तालुक्यात सन १९८०-८५ या कालावधीत जी सहा पाझर तलावांची कामे हाती घेण्यात आली होती त्या पाझर तलावांचे मूळ सर्वेक्षण

व अंदाजपत्रके पाटबंधारे विभागाच्या लघु पाटबंधारे विभाग यंत्रणेकडून तयार करण्यात आले होते. त्यामुळे पाझर तलावांच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकातील त्रुटी, अनियमितता व कामाच्या विलंबाची संपूर्ण जबाबदारी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात आली आहे. पाच पाझर तलावांच्या बांधकामांपैकी बेकनाळ क्र -१ तालुका गडहिंग्लज या पाझर तलावाचे काम १९८३ साली सुरु करण्यात आले परंतु बुडीत क्षेत्रात पुरेशी माती उपलब्ध नसल्याचे कारण सांगून ठेकेदाराने १९८५ पासून काम बंद ठेवले. पाझर तलावास आवश्यक असलेली माती उपलब्ध करुन दिल्यानंतरही आणि कामे पूर्ण करण्यातील अडचणी सोडविण्याच्या दृष्टिने खात्याने सर्व सहकार्य देऊनही ठेकेदाराने कामे पूर्ण करण्यास टाळाटाळ केलेली आहे या कामी ठेकेदार जबाबदार आहे. ठेकेदाराच्या कामे न करण्याच्या आणि कामे अर्धवट सोडण्याच्या कारणांमुळे ही कामे पूर्ण होवू शकलेली नहीत. जिल्हा परिषदेने या कामांवर देखरेखीचे नियंत्रण ठेवणे आवश्यक होते. जिल्हा परिषदेच्या बेजबाबदारपणामुळेच बांधकामाच्या ठेकेदारांवर नियंत्रण राहिले नाही. कामे अर्धवट विलंब अवस्थेत पडून राहिली असे समितीचे ठाम मत आहे. यापुढे ठेकेदारांना कामे देतांना मागील कामांची पार्श्वभूमी विचारात घेवून पुढील कामे द्यावयाची की नाही हे निश्चित करावे.

वन खात्याच्या अडथळ्यांमुळे कामांमध्ये विलंब होतो म्हणून वन खात्यांकडून मान्यता मिळाल्यावरच कामे सुरु करावीत असे समितीचे मत आहे. हलकर्णी पाझर तलाव ता.गडहिंग्लज या पाझर तलावाचे काम सुरु करण्यापूर्वी मातीच्या उपलब्धतेबाबत तपासणी करणे आवश्यक होते. परंतु तसे न केल्यामुळे भूसंपादनाच्या अडचणीमुळे कामे खोळंबल्याचे आढळून आले आहे. जिल्हा परिषदेकडून भूसंपादनाच्या कामाची येथोचित कार्यवाही झालेली नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या १३ ऑगस्ट, २००३ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडील ६ पाझर तलावांची कामे ठेव तत्त्वावर कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, कोल्हापूर यांच्याकडे वर्ग करण्याच्या प्रस्तावाची अंमलबजावणी तातडीने होण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा असे समितीचे मत आहे. अत: या पाझर तलावाची कामे सुरु होऊन आज जवळ जवळ २० ते २५ वर्षांचा कालावधी लोटलेला आहे. पाझर तलावाची कामे पूर्ण झाली नसल्याने त्यामध्ये शासनाचा निधी अडकून पडल्यामुळे त्या पाझर तलावांचा फायदा स्थानिक शेतकऱ्यांना झाला नाही. त्यामुळे आता ही कामे करण्यासाठी सर्व तांत्रिक व प्रशासकीय बाबींची पूर्तता करण्यास पुढील तीन महिन्यांच्या आत पाझर तलावांची कामे सुरु करावी अशी समितीची शिफारस आहे.

चार : अंजनगाव, ता.हिंगणा पाणीपुरवठा योजना, जि.प. नागपूर (प्रशासन)

समितीला प्राप्त झालेल्या एकूण माहितीवरून असे दिसून येते की, अंजनगाव, तालुका हिंगणा, नळ पाणीपुरवठा योजनेचे मूळ अंदाजपत्रक रुपये ८,३८,८०० होते तथापि, प्रत्यक्षात आतापर्यंत कंत्राटदारास रुपये ९,२०,४४८ देण्यात आलेले आहेत. या योजनेकरिता सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. सदरहू कंत्राटदाराने या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत विहिरीवर पंप व तद्नुषंगिक साहित्य बसविणे, पाण्याची टाकी ही कामे केलेली नाहीत. तसेच पाईप लाईनची लांबीही जास्त दाखवून ही कामे न करतानाच कंत्राटदाराला सर्व पैसे देण्यात आल्यामुळे रुपये ३,०३,४२० जास्त दिले गेले असे साक्षीच्या वेळी सचिवांनी मान्य केले आहे. या गैरव्यवहार प्रकरणी कार्यकारी अभियंता, श्री.दलाल, उप अभियंता, श्री.पशीने व कनिष्ठ अभियंता, श्री.मगर हे दोषी असल्याचे आढळून आले आहे. त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी चालू असल्याचे समितीला साक्षीच्या वेळी सांगण्यात आले आहे. सबब, ही कारवाई विनाविलंब पूर्ण करून त्यांच्यावर केलेल्या अंतिम कारवाईची माहिती विनाविलंब देण्यात यावी, अशी समितीने दुसऱ्या अहवालात शिफारस केली होती.

या शिफारशीसंबंधात नागपूर जिल्हा परिषदेने केलेल्या कारवाईबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत जिल्हा परिषदेने असे नमूद केले की, अंजनगांव, ता.हिंगणा, जि.नागपूर येथील पाणीपुरवठा योजनेसंबंधी शाखा अभियंता, श्री.मगर, यांच्या विरुध्द विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या मार्फत विभागीय चौकशी पूर्ण होऊन शिक्षा प्रस्तावित करण्यात आली असून, अंतिम शिक्षेची कार्यवाही सुरु आहे. श्री.ए.पी.दलाल, तत्कालीन कार्यकारी अभियंता, तसेच तत्कालिन उपविभागीय अधिकारी श्री.के.एम.पशिने आणि श्री.एन.एम.येमदे यांच्याविरुध्द मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, नागपूर यांच्यामार्फत शिस्त भंगाची कार्यवाही सुरु आहे. या कार्यवाहीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडून मूळ कागदपत्राची मागणी करण्यात आली आहे. तथापि, जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडे या प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु असल्याने मूळ कागदपत्र वेळीच सादर करता आले नाहीत. जिल्हा परिषद स्तरावरील कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी पूर्ण झालेली आहे. मूळ कागदपत्र लवकरच मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, यांना सादर करण्यात येत आहेत.

या प्रकरणी विभागीय चौकशी केली असता संबंधित शाखा अभियंता, श्री.मगर दोषी आढळले. शाखा अभियंता यांचेविरुध्द सहाय्यक आयुक्त (चौकशी), नागपूर विभाग, नागपूर यांचेकडून विभागीय चौकशी पूर्ण करण्यात आली. चौकशी अहवालाला अनुसरून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नागपूर यांच्या दिनांक ०९/०६/२००३ च्या आदेशानुसार श्री.मगर यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले असून वसुलीची रक्कम रुपये १,०१,४००/- यांचकडून एकरकमी वसुलीचे आदेश देण्यात आले आहेत.

तत्कालिन कार्यकारी अभियंता श्री. ए. पी. दलाल व उपअभियंता, श्री.पशिने यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईसाठी प्रस्ताव मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, नागपूर यांच्याकडून दि.२५.१०.२००० चे पत्रान्वये पाटबंधारे विभागास प्राप्त झालेला होता. दरम्यान श्री.दलाल हे नियत वयोमानानुसार दि.३१ ऑगस्ट,२००२ रोजी सेवानिवृत्त झाल्याने दोषारोपपत्र

आली नाहीत. तसेच श्री.पशीने, उप अभियंता हे नियत वयोमानानुसार दिनांक ३१/१०/२००० रोजी सेवानिवृत्त झाल्याने दोषारोपपत्र बजावता आले नाहीत. त्याशिवाय श्री.येमदे, उप अभियंता यांच्याविरुध्द मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, नागपूर यांनी दिनांक १२/०३/२००३ रोजी दोषारोपपत्र बजावलेली आहेत.

समितीसमोर प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने १८जून,२००३ रोजी पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,पाटबंधारे विभाग,ग्रामविकास व जलसंधारण विभाग या विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी पृच्छा केली की, या प्रकरणात सेवा निवृत्त होईपर्यंत चौकशीस विलंब होण्याची कारणे काय आहे. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, सेवानिवृत्त होण्याआधी ४वर्षापूर्वीची घटना असेल तर संबंधितावर महाराष्ट्र सेवाशर्ती नियम २७ अन्वये कारवाई होऊ शकते जोपर्यंत संबंधित व्यक्तीवर दोषारोप पत्र बजावले जात नाही तोपर्यंत त्यांचे विरुध्द चौकशी चालू होते असे मानले जात नाही. याबाबत सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समिती समोर असा खुलासा केला की, अंजनगांव, ता.हिंगणा पाणीपुरवठा योजनेचे ज्या कंत्राटदाराने काम केले होते, त्यांनी आणि इंजिनियरने संगनमत करुन न झालेल्या कामाचे काम झालेले आहे असे दाखवून रक्कम देण्यात आलेली आहे. ते रुपये ३,०३,४२०/- जस्तीचे देयक अदा झाले होत हे प्रकरण उघडकीस आल्या नंतर त्याच्याकडून राहिलेले प्रलंबित काम करुन घेण्यात आले आहे. रुपये ९०,०००/- पाईपलाईनचे आणि दुसरे रुपये २१,०००/- पाण्याच्या टाकीचे काम व कनेक्शन साहित्य व इतर काही कामे करुन घेतली. असे एकूण रुपये २,३,०००/- चे काम नंतर करुन घेतले. कॉन्ट्रक्टरला एकूण ३ लाख ३ हजार चारशे वीस एवढी रक्कम काही न करता अगोदरच अदा केलेली आहे अशा प्रकारे जास्त पैसे देऊन गुन्हा घडलेला आहे त्या कॉन्ट्रक्टरकडून पैस वसूल करण्यात आले आहे काय ? यावर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी काम करता ते काम झाले आहे असे दाखवून पैसे घेतले होते व तो गुन्हा आहे त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे असे स्पष्टीकरण केले. मेसर्स निकाजी कंन्स्ट्रक्शन कंपनीने हे काम केले त्यांच्याविरुध्द दिनांक ३ सप्टेंबर,१९९९ रोजी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला. तसेच संबंधित कामाच्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याचे काम चालू असतानाच त्यांच्याकडून काम करुन घेण्याचा निर्णय कोणी व का घेतला याची माहिती समितीला नंतर कळविण्यात येईल असे सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीसमोर स्पष्ट केले. या संबंधी कनिष्ठ अभियंता व कार्यकारी अभियंता व ठेकेदार हे जबाबदार असल्याचे सांगण्यात आले. त्यानुसार कनिष्ठ अभियंता यांना नोकरीतून बडतर्फ करण्यात आले आहे. दुसरे उप अभियंता निवृत्त झाले ते ऑक्टोबर,२००० मध्ये निवृत्त झाले आणि दलाल ऑक्टोबर,२००२ मध्ये निवृत्त झाले त्यांच्यावरील कारवाईबाबत विलंब झाला हे मान्य केले आहे. कार्यकारी अभियंत्यावर कारवाई करण्याचे अधिकार शासनाच्या पाटबंधारे विभागाला आहे. उपअभियंत्यावरील कारवाईबाबत

जिल्हापरिषदेने प्रकरण मुख्य अभियंता यांच्याकडे पाठविले होते. परंतु याबाबत विलंब झाला होता हे बरोबर आहे. कार्यकारी अभियंत्यांच्या निवृत्त होण्यास बराच वेळ

होता परंतु त्याच्यावरही तोपर्यंत कारवाई करता आली नाही. त्यांच्याबाबत प्रस्ताव आल्यानंतर पाटबंधारे खात्याकडून ११-७ ला परत पृच्छेकरिता जिल्हापरिषदेकडे प्रकरण पाठविले पण जिल्हा परिषदेने दाद दिली नाही. त्यानंतर पाटबंधारे खात्याने १३/३/२००२ ला आम्हाला कळविले की, जिल्हापरिषद आम्हाला आवश्यक माहिती देत नाही. तेव्हा आमच्याकडून ३/४/२००२, २४/६/२००२, ३/३/२००२ आणि १५/९/२००२ अशाप्रकारे चार वेळा कळविण्यात आले. यामध्ये तीन वेळा जिल्हा परिषदेला आणि एक वेळा आयुक्तांना पत्र पाठविण्यात आले आणि त्यानंतर त्यांचे उत्तर ७/१/२००२ ला आम्हाला प्राप्त झाले. या संबंधी जिल्हा परिषदेकडून शासनाकडे कोणतीही माहिती पाठविण्यात आलेली नाही म्हणून समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली आहे.

शासनाकडून (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग) लेखी माहिती खालीलप्रमाणे प्राप्त झाली आहे:-

(१) अंजनगांव पाणीपुरवठा योजनेत झालेल्या गैरव्यहाराप्रकरणी कंत्राटदारावर कार्यवाही करण्याबाबत जिल्हा परिषदेच्या विधी सल्लागाराचा सल्ला घेण्यात आला होता. त्यावर विधी सल्लागाराने असे मत प्रकट केले की, झालेल्या कामात सुधारणा करुन घेणे व अधिक झालेल्या भूगतानाची कंत्राटदारास देय असलेल्या रकमेतून वसुली करणे जिल्हा परिषदेच्या दृष्टीने अधिक हितावह होईल. म्हणून त्यावेळी पोलीस तक्रार करणे उचित वाटले नाही. दरम्यान, कंत्राटदाराने विहिरीचे खोदकाम १५ मीटर पर्यंत पूर्ण केले. विहिरीवर दोन पंप बसविण्याचे काम पूर्ण केले. तसेच हायस्टिंगचे काम पूर्ण केले. शासकीय नुकसान कमी करुन घेण्यासाठी वरील तीन कामे करुन घेतल्या नंतर सुध्दा पाईप वापरल्याचे दाखवून कंत्राटदारांनी रुपये १,२३,५२८/- अधिक उचल केली असल्यामुळे कंत्राटदाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणे अगत्याचे असल्याचे निष्कर्ष काढून त्याप्रमाणे कंत्राटदाराविरुध्द पोलीस स्टेशन, बोरी येथे दिनांक ३ जून,१९९९ रोजी तक्रार नोंदविण्यात आली होती. यावर पोलिस स्टेशन, बोरी यांनी असे कळविले की, सदर गुन्हा अ दाखलपात्र आहे. जरुर वाटल्यास आपण या संबंधी न्यायालयात फिर्याद नोंदवावी त्यावर जिल्हा परिषदेच्या विधी सल्लागाराचे मत घेण्यात आले असून त्यांच्या मार्गदर्शनानुसार पोलीस स्टेशन, बोरी येथे कंत्राटदाराविरुध्द तक्रार दिनांक १/७/२००३ रोजी दाखल केली आहे.

(२) कंत्राटदाराचे पंजीकरणाचे नुतनीकरण न करण्याबाबत जिल्हा परिषदेमार्फत सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना कळविण्यात आले. त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांच्या दिनांक ७ जुलै,१९९९ च्या पत्रान्वये अधिक माहिती सादर करण्याचे जिल्हा परिषदेला कळविले. सदर माहिती जिल्हापरिषदेमार्फत दिनांक २७ जून,२००३ रोजी सादर करण्यात

आली आहे. माहिती सादर करण्यास झालेल्या विलंबाबाबत कार्यकारी अभियंता, यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येत आहे.

(३) या योजनेच्या कंत्राटदाराची जिल्हा परिषद खालील कामे असून या कामाकरिता खालीलप्रमाणे सुरक्षा ठेव रक्कम जिल्हा परिषदेकडे आहे.

कामाचे नाव		सुरक्षा ठेव
(१) अंजनगांव पाणीपुरवठा योजना	रुपये	४३,९१४
(२) कुकडो पांजरा पाझर तलाव, ता.कटोल	रुपये	१,३२,२९२
(३) अंबाडा पाझर तलाव, ता.कटोल	रुपये	१,१०,१९७
(४) चांदणी बर्डो को.प. व बंधारा, ता.नरखेड	रुपये	२८,०६६
एकूण	रुपये	३,१४,४६९

सुरक्षा ठेव रकमेतून मं. निकाजू कन्स्ट्रक्शन यांच्याकडून रुपये १,२३,५२८/- एवढी रक्कम वसूल करण्याचे आदेश जिल्हा परिषदेमार्फत दि.२१ जून,२००३ रोजी देण्यात आले होते. त्यानुसार रुपये १,२३,५२८/- एवढ्या रक्कमेची वसुली दिनांक ३० जून,२००३ रोजी करण्यात आली व ती रक्कम जिल्हानिधीत जमा करण्यात आली.

(४) विभागीय चौकशीकरिता पाटबंधारे विभागाने त्यांच्या दिनांक ११ जुलै,२००१ च्या पत्रान्वये मागविलेली माहिती दिनांक ७ नोव्हेंबर,२००२ रोजी शासनास सादर केली. या प्रकरणी झालेल्या विलंबाकरिता चार कार्यकारी अभियंता व श्री.बंड, कक्ष अधिकारी हे पूर्णपणे जबाबदार असल्याचे निदर्शनास आले. यात प्रामुख्याने कक्ष अधिकारी जास्त जबाबदार असल्याचे निदर्शनास येते. दि.११ सप्टेंबर,२००१ ते १७ ऑक्टोबर,२००१ पर्यंत नस्तीवर त्यांचेकडून कार्यवाही झाली नाही. त्यांनी दिनांक १८ ऑक्टोबर,२००२ रोजी नस्ती सादर केली व माहिती शासनास दि.७ सप्टेंबर,२००२ रोजी सादर केली. या विलंबाबाबत त्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.

अभिप्राय व शिफारशी :

अंजनगांव पाणीपुरवठा योजनेत कंत्राटदाराने पाइप लाईन टाकण्याच्या मोजमापात कमी पाईप वापरुन जास्त पाईप वापरल्याचे दाखवून रुपये १,२३,५२८/- एवढ्या रक्कमेची अधिक उचल केली असल्यामुळे कंत्राटदाराविरुध्द बोरी पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याचा पाठपुरावा जिल्हा परिषदेकडून करण्यात यावा. तसेच या कंत्राटदाराच्या पंजीकरणाचे नुतनीकरण न करण्याच्या शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी कठोरतेने करावी आणि या प्रकरणी माहिती सादर करण्यास झालेल्या

विलंबास ज्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे त्यांच्यावर या संदर्भात कोणती कार्यवाही शासनाकडून करण्यात आली आहे त्याचा अहवाल समितीस तीन महिन्यांत सादर करावा.

पाच : सकळी-कलार, ता.हिंगणा विहिर पाणीपुरवठा योजना, जि.प.,नागपूर (प्रशासन)

हिंगणा तालुक्यातील सुकळी-कलार पाणीपुरवठा योजनेचा उद्‌भव असलेल्या विहिरीत उन्हाळ्यात पाणी कमी पडत असल्याने विहिरीत पाणी वाढविण्याच्या दृष्टीने विहिरीला आडवा बोअर मारण्याचे काम सन १९९४ मध्ये टंचाईग्रस्त भागातील काम म्हणून हाती घेण्यात आले. सदर कामाची प्राकलिन किंमत रुपये ६.३६ लक्ष इतकी होती. हे काम ज्या कंत्राटदारास देण्यात आले होते त्याने हे काम प्रत्यक्षात न करताच अधिकाऱ्यांच्या संगनमताने ते केले असे दाखवून कामाचे पैसे घेतले. या प्रकरणी कंत्राटदाराला रुपये २९,४००/- जास्तीचे देण्यात आले आहेत.

उक्त गैरव्यवहार प्रकरणी संबंधित शाखा अभियंता, श्री.जांभुळकर यांना निलंबित करण्यात आले असून कार्यकारी अभियंता, श्री.दलाल व उप अभियंता श्री.पशिने हे पाटबंधारे विभागाकडून जिल्हापरिषदेकडे प्रतिनियुक्तीवर आले असल्याचे त्यांनी विभागीय चौकशी करण्याबाबत पाटबंधारे विभागास कळविण्यात आले असल्याचे साक्षीच्या वेळी समितीला सांगण्यात आले आहे.

सबब, सदर कार्यकारी अभियंता यांच्याविरुध्दची विभागीय चौकशी लवकर पूर्ण करुन, केलेल्या कारवाईची माहिती समितीला विनाविलंब कळविण्यात यावी, अशी समितीने दुसऱ्या अहवालात शिफारस केली होती.

या शिफारशीसंबंधात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने असे नमूद केले की, प्रस्तुत प्रकरणी सर्वश्री ए.पी.दलाल, कार्यकारी अभियंता, यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम,१९७९ मधील नियम-८ खाली विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग यांच्याकडून पाटबंधारे विभागास मे २००१ मध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर विभागीय चौकशीमध्ये उपस्थित त्रुटींची पूर्तता करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडून दिनांक ११ जुलै,२००१ च्या पत्रान्वये माहिती मागविण्यात आली होती. सदर माहिती जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडून वारंवार स्मरणपत्रे पाठवूनही विलंबाने दिनांक ७ नोव्हेंबर २००२ च्या पत्रान्वये शासनास

सादर करण्यात आली. दरम्यानच्या काळात श्री.दलाल, कार्यकारी अभियंता हे दिनांक ३१ ऑगस्ट,२००२ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने निवृत्तीपूर्वी त्यांच्यावर दोषारोपपत्रे बजावता आली नाहीत.

अभिप्राय व शिफारशी :

हिंगणा तालुक्यातील सुकळी-कलार, तालुका हिंगणा येथील विहिर पाणीपुरवठा योजनेतील कंत्राटदारास काम प्रत्यक्षात न करताच अधिकाऱ्यांच्या संगनमताने ते काम केले आहे असे दाखवून रुपये २९ हजार ४०० जास्तीची रक्कम देण्यात आली या गैरव्यवहार प्रकरणी श्री.ए.पी.दलाल, कार्यकारी अभियंता यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) या नियमांखाली मे २००१ मध्ये विभागीय चौकशी सुरु करण्याच्या कारवाईला जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडून हेतुपुरस्सर विलंब झालेला आहे. श्री.दलाल, कार्यकारी अभियंता हे दिनांक ३१ ऑगस्ट, २००२ रोजी सेवानिवृत्त झाले ते सेवानिवृत्त होईपर्यंत त्यांच्यावर त्यांनी केलेल्या गैरव्यवहार प्रकरणी ठोस स्वरुपाची कारवाई करता आलेली नाही याबाबत समिती शासनाच्या अकार्यक्षम व निष्क्रिय भुमिकेबाबत नापसंती व्यक्त करीत असून यापुढे गैरव्यवहार करणाऱ्यांना आळा बसावा म्हणून अशा कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीपुर्वीच कायदेशीररित्या विभागीय चौकशी पूर्ण करुन कारवाई करण्यात यावी याची कटाक्षाने दक्षता घेण्यात यावी.

परिशिष्ट 'अ'

परिशिष्ट " अ "

अहवालातील परिच्छेद क्र.एक कुमार विद्यामंदिर प्राथमिक शाळेबाबत----

मुख्यालयी न राहणाऱ्या शिक्षकांविरुध्द कारवाई करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्रमांक अराप १०००/प्र.क्र.३१३२/१५

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ नोव्हेंबर २०००

वाचा. - (१) शासन परिपत्रक, ग्रा.वि.वि.क्र.अराप १०९३/प्र.क्र.(२०२)/१५, दि.१६ जून,१९९३

(२) शासन परिपत्रक, ग्रा.वि.व ज.सं.वि.क्र.अराप १०९३/प्र.क्र.२०२/१५, दि.५ जानेवारी १९९४

(३) शासन परिपत्रक, ग्रा.वि. व ज.सं.वि.क्र.अराप १०९३/प्र.क्र.२०२/१५, दि. १८ ऑक्टोबर,१९९४

(४) शासन परिपत्रक,ग्रा.वि.व ज.सं.वि.क्र.अराप१०९६/१८६५/प्र.क्र.११३७/१५ दि. २६ एप्रिल १९९६

परिपत्रक

जिल्हा परिषदेमधील कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहणे आवश्यक आहे. कर्मचारी मुख्यालयी न राहिल्यास त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल असे आदेश प्रस्तावनेत नमूद केलेल्या शासन परिपत्रकान्वये वेळोवेळी निर्गमित केले आहेत. सदर आदेश शिक्षकांसाठीही लागू आहेत. असे असतांनाही जिल्हा परिषदेमधील शिक्षक हे मुख्यालयी राहत नसल्याचे पंचायत राज समितीच्या वारंवार निदर्शनास येत आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेमधील जे शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करावी अशी शिफारस पंचायत राज समितीने केली आहे. त्याकरिता शासन आता असे आदेश देत आहे की, जिल्हा परिषदेमधील शिक्षकांनी मुख्यालयी राहणे अनिवार्य आहे. जे शिक्षक मुख्यालयी

राहत नाहीत असे आढळून आल्यास त्यांच्याविरुध्द तातडीने कठोर कारवाई करावी. अन्यथा संबंधित शिक्षकांविरुध्द कारवाई न करण्यास जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्या विरुध्द तातडीने कारवाई करण्यात यावी. हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याबाबत दक्षता घ्यावी.

२. वरील आदेशांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

माहाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(चंद्रा अय्यंगार),
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

(१) सर्व विभागीय आयुक्त,
(२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
(३) सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
(४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेख व वित्त अधिकारी,
(५) कार्यासन क्र.१२,१३,१४,१७,१८,२० व ३८, ग्राविकास व जलसंधारण विभाग,
(६) निवड नस्ती, कार्यासन क्र.१५.

परिशिष्ट " अ "

पंचायत राज समितीच्या बैठकीस योग्य व सविस्तर माहिती देणेबाबत तसेच माहिती पुरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

परिपत्रक क्रमांक पंरास.२००३/प्र.क्र.१३५/पं.रा.५ (३८)

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ जून २००३.

परिपत्रक

पंचायत राज समितीने जिल्ह्यांच्या भेटीवर आधारित प्रलंबित मुद्यांवर प्रशासकीय विभागाच्या सचिवांच्या साक्षीमध्ये असे निदर्शनास आणले की, समिती जेव्हा जिल्हा परिषदांना भेटी देते तेव्हा त्यांना तेथील अधिकाऱ्यांकडून एखाद्या प्रकरणातील संपूर्ण व सविस्तर माहिती दिली जात नाही. तसेच या बैठकीत जिल्ह्यातील अधिकाऱ्याकडून काही मुद्यांवर विहित कालावधीत माहिती पाठविण्याचे आश्वासन दिले जाते, मात्र ही माहिती सुध्दा जिल्हा परिषदांकडून समितीस प्राप्त होत नाही, हे योग्य नाही. याबाबत असे स्पष्ट करण्यात येते आहे की, पंचायत राज समिती ही महाराष्ट्र विधान मंडळाची महत्त्वाची समिती असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजाची पाहणी करण्याचे व झालेली अनियमितता टाळण्याबाबत मार्गदर्शन करण्याचे महत्वाचे काम या समितीकडे आहे. त्यामुळे समितीच्या भेटीच्या वेळी, त्यांनी विचारलेल्या मुद्यांवर सविस्तर व स्पष्ट वस्तुस्थितीदर्शक माहिती समितीस देणे बंधनकारक आहे. मोघम आणि दिशाभूल करणारी माहिती समितीस देणे टाळून उपस्थित मुद्यांवरील संपूर्ण माहिती जबाबदारीने समितीस देण्यात यावी. अशी माहिती दिली गेली नाही तर, तो समितीचा हक्कभंग ठरतो. तरी असे कळविण्यात येत आहे की, जिल्हा परिषदांनी पंचायत राज समितीच्या भेटीच्या वेळी समितीस आवश्यक सर्व माहिती सविस्तरपणे देणे बंधनकारक आहे. तसेच समितीच्या बैठकी दरम्यान चर्चेमध्ये माहिती पाठविण्याबाबत समितीकडून जी मुदत देण्यात आलेली आहे, त्या मुदतीत समितीकडे माहिती पाठविणे जिल्हा परिषदांना बंधनकारक आहे. त्यामुळे यापुढे पंचायत राज समितीच्या भेटी दरम्यान

समितीस माहिती देणे व माहिती पाठविणे याबाबत काटेकोर दक्षता घेऊन कालमर्यादेचे पालन करणे आवश्यक आहे. यात त्रुटी आढळल्यास अथवा अनियमितता झाल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र राहतील, असेही कळविण्यात येत आहे.

या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

एस.एस.हुसैन,
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

(१) विभागीय आयुक्त (सर्व),
(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
(३) उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (पंचायत राज समिती), विधान भवन, मुंबई.

परिशिष्ट 'ब'

परिशिष्ट " ब "

बैठक : दिनांक १२ जून २००३

स्थळ : विधान भवन, मुंबई.

वेळ : दुपारी ११-३० ते दुपारी ०१-३०

उपस्थित सदस्य

(१) श्री.राजन पाटील, वि.स.स. (समिती प्रमुख)

(२) श्री.जयंत ससाणे, वि.स.स.

(३) श्री.अविनाथ वारजूकर, वि.स.स.

(४) श्री.अमर काळे, वि.स.स.

(५) श्री.संपतराव पवार-पाटील, वि.स.स.

(६) श्री.रोहिदास चव्हाण, वि.स.स.

(७) श्रीमती.मनिषा निमकर, वि.स.स.

(८) श्री.प्रतापराव जाधव, वि.स.स.

(९) श्री.गणपत कदम, वि.स.स.

(१०) श्री.ज्ञानेश्वर धाने-पाटील, वि.स.स.

(११) श्रीमती.शोभाताई फडणवीस, वि.स.स.

(१२) श्री.रामचंद्र नावंदिकर, वि.स.स.

(१३) श्री.मधुकर कुकडे, वि.स.स.

(१४) श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.प.स.

(१५) श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.यु.के.चव्हाण, उप सचिव,

(२) श्री.शं.तु.गावडे, अवर सचिव,

(३) श्री.नि.वि.कवळे, कक्ष अधिकारी.

मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई

श्री.सी.जी.पवार, मुख्य लेखा परीक्षक.

मंत्रालयीन विभाग

श्री.एस.एस.हुसैन, सचिव, ग्रामविकास विभाग.

श्री.एस.एस.मोमिन, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत)

श्री.व्ही.पी.बोरगे, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते)

श्री.प्रभाकर देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर.

श्री.मृणाल कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर.

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने दुसऱ्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात सचिव, ग्रामविकास; सचिव, बांधकाम विभाग; सचिव, जलसंधारण विभाग; सचिव, पाटबंधारे विभाग यांची साक्ष घेतली.

बैठक : दिनांक १८ जून २००३
स्थळ : विधान भवन, मुंबई.
वेळ : दुपारी ११-३० ते दुपारी ०१-३०

उपस्थित सदस्य

(१) श्री.राजन पाटील, वि.स.स. (समिती प्रमुख)
(२) श्री.जयंत ससाणे, वि.स.स.
(३) श्री.नरेशचंद्र ठाकरे, वि.स.स.
(४) श्री.अविनाथ वारजूकर, वि.स.स.
(५) श्री.अमर काळे, वि.स.स.
(६) श्री.संपतराव पवार-पाटील, वि.स.स.
(७) श्री.रोहिदास चव्हाण, वि.स.स.
(८) श्रीमती.मनिषा निमकर, वि.स.स.
(९) श्री.गणपत कदम, वि.स.स.
(१०) श्री.ज्ञानेश्वर धाने-पाटील, वि.स.स.
(११) श्री.खोमेश्वर रहांगडाळे, वि.स.स.
(१२) श्री.मधुकर कुकडे, वि.स.स.
(१३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.प.स.
(१४) श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.
(१५) श्री.बळवंतराव ढोबळे, वि.प.स.
(१६) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.यु.के.चव्हाण, उप सचिव.
(२) श्री.शं.तु.गावडे, अवर सचिव.
(३) श्री.नि.वि.कवळे, कक्ष अधिकारी.

मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई

श्री.सी.जी.पवार, मुख्य लेखा परीक्षक.

मंत्रालयीन विभाग

(१) श्री.बी.सी.खटूआ, सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग.

(२) श्रीमती माधुरी तळाशीकर, उप सचिव, पाटबंधारे विभाग.

(३) श्रीमती कुंदा गोसावी, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग.

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने दुसऱ्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग; सचिव, पाटबंधारे विभाग यांची साक्ष घेतली.

बैठक : दिनांक २ जुलै २००३
स्थळ : विधान भवन, मुंबई.
वेळ : दुपारी १-०० ते दुपारी २-००

उपस्थित सदस्य

(१) श्री.जयंत ससाणे, वि.स.स.
(२) श्री.सुरेश लाड, वि.स.स.
(३) श्री.रमेशचंद्र बंग, वि.स.स., कार्यकारी समिती प्रमुख
(४) श्री.संपतराव पवार-पाटील, वि.स.स.
(५) श्री.रोहिदास चव्हाण, वि.स.स.
(६) श्री.गणपत कदम, वि.स.स.
(७) श्री.ज्ञानेश्वर धाने-पाटील, वि.स.स.
(८) श्री.खोमेश्वर रहांगडाळे, वि.स.स.
(९) श्री.रामचंद्र नावंदिकर, वि.स.स.
(१०) श्री.मधुर कुकडे, वि.स.स.
(११) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.प.स.
(१२) श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.यु.के.चव्हाण, उप सचिव,
(२) श्री.शं.तु.गावडे, अवर सचिव,
(३) श्री.नि.वि.कवळे, कक्ष अधिकारी.

मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई

श्री.सी.जी.पवार, मुख्य लेखा परीक्षक.

मंत्रालयीन विभाग

(१) श्री.कुणाल कुमार, मु.का.अ., जि.प., नागपूर.

(२) श्री.आर.एन.देशमुख, सह सचिव, पाणीपुरवठा विभाग.

(३) श्रीमती माधुरी तळाशीकर, उप सचिव, पाटबंधारे विभाग.

(४) श्री.एस.एस.साठविलकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग.

(५) श्री.पु.ही.वागदे, अवर सचिव, पाणीपुरवठा विभाग.

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने दुसऱ्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर; सह सचिव, पाणीपुरवठा विभाग; उप सचिव, पाटबंधारे विभाग; उप सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली.

बैठक : दिनांक २९ नोव्हेंबर २००३
स्थळ : विधान भवन, मुंबई.
वेळ : दुपारी १-०० ते दुपारी १-३५

उपस्थित सदस्य

(१) श्री.संपतराव पवार-पाटील, वि.स.स., (कार्यकारी समिती प्रमुख)
(२) श्री.सुरेश लाड, वि.स.स.
(३) श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.
(४) श्री.खोमेश्वर रहांगडाळे, वि.स.स.
(५) श्री.रामचंद्र नावंदिकर, वि.स.स.
(६) श्री.मधुकर कुकडे, वि.स.स.
(७) श्री.मदन पाटील, वि.प.स.
(८) श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.यु.के.चव्हाण, उप सचिव,
(२) श्री.शं.तु.गावडे, अवर सचिव,
(३) श्री.नि.वि.कवळे, कक्ष अधिकारी.

मुख्य लेखा परीक्षक (स्थानिक निधी लेखा कार्यालय)

श्री.सी.जी.पवार, मुख्य लेखा परीक्षक.

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने दुसऱ्या अनुपालन अहवालाच्या प्रारूपावर विचार करून काही सुधारणांसह संमत केला.